





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २४.०९.२०२५ | अंक नं. १४८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






**मोठा व्यवसाय करायचा आहे?**

तर घ्या, मुख्य चौकात २ एकर कमर्शियल प्लॉट!

**प्राईम लोकेशन, क्लिअर टायटल**

Prime Properties- 7498956035









जीपीओ रोडवर साचलेले पावसाचे व ड्रेनेजचे पाणी तर दुसऱ्या छायाचित्रात शहरातील जुना मंगळवार बाजार परिसरात रस्त्यावर वाहत असलेले ड्रेनेजचे पाणी. (छाया - बबलू शेख)

# प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचा होतोयं त्रास; २६ सप्टेंबर रोजी महापालिकेसमोर करणार आत्मदहन

**वकिलाचा आयुक्तांना निवेदनाद्वारे इशारा; ठिकठिकाणी ड्रेनेज लाईन तुंबल्या, दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर, सर्वत्र झालीयं दलदल; आरोग्य धोक्यात**

नगर - महापालिकेच्यावतीने शहरात रस्त्याची, ड्रेनेजची तसेच चेंबर दुरुस्तीची कामे करताना कुठलेही नियोजन केले जात नसल्याने ऐन नवरात्रोत्सवात ठिकठिकाणी ड्रेनेज लाईन तुंबल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर वाहत असून त्यामुळे सर्वत्र दलदल निर्माण झाली आहे. याचा नागरिकांना प्रचंड मनस्ताप होत आहे. त्यामुळे महापालिकेच्या या नियोजनशुन्य कारभाराबाबत नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जिल्हाधिकारी निवासाजवळच मोठ्या प्रमाणात चिखल व दलदल

जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्टेट बँकेकडे जाणारा जीपीओ रस्ता कॉंक्रिटीकरणासाठी खोदल्यामुळे साचलेले पावसाचे पाणी व ड्रेनेज फुटल्याने व नळ कनेक्शन फुटल्याने मोठ्या प्रमाणात चिखल व दलदल झाल्यामुळे या भागातील रहिवासी व जाणारे येणारे वयस्कर व बुऱ्हाणनगर येथे देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत तातडीने उपाययोजना न केल्यास २६ सप्टेंबर रोजी महापालिका कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा वॉर्ड क्र. १२ व १३ मधील नागरिकांनी दिला आहे.

याबाबत ॲड. सलीम मोहम्मद शरीफ रंगरेज यांच्यासह नागरिकांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या भागात रस्त्याचे कॉंक्रिटीकरणामुळे, रस्त्याचे खोदकाम केल्यामुळे, चेंबरलाईन, पाणी कनेक्शन व सध्या झालेल्या पावसामुळे रस्त्यात दोन ते तीन फूट सांडपाणी साचल्याने दुर्गंधी निर्माण झालेली आहे. सदरचा रस्ता हा रहदारीचा असून तेथून अनेक नागरीक, शाळेत जाणारी लहान मुले, वयस्कर तसेच सध्या नवरात्र चालू असल्यामुळे बुऱ्हाणनगरकडे जाणाऱ्या देवीभक्तांची येथे कायम वर्दळ असते. तसेच या वॉर्डमध्ये हनुमान मंदीर, राम मंदीर, व्यंकटेश मंदीर, पोस्ट ऑफिस, प्रांत ऑफिस, टेलिफोन भवन असे अनेक शासकीय कार्यालये आहेत. तसेच विजयादशमी हा सण जवळ आल्यामुळे किल्ल्याजवळ रावणदहनाचा रुढी परंपरेप्रमाणे मोठ्या प्रमाणात कार्यक्रम साजरा केला जातो. त्यामुळे नगर शहरातील संपूर्ण हिंदू समाज सदर भागात कार्यक्रमासाठी जमा होतो. त्यामुळे वॉर्ड क्र. १२ व १३ मध्ये पावसामुळे व अन्य कारणांमुळे जी गैरसोय निर्माण झालेली आहे. ती आपण समक्ष युध्द पातळीवर त्याचा बंदोबस्त करण्यात यावा व नागरीकांची होत असलेली गैरसोय व त्रास दुर करण्यात यावा. पावसाचे पाणी साचल्यामुळे व चिखल झाल्यामुळे बऱ्याच नागरिकांना दुखापत झालेली आहे. *(पुढील मजकूर पान २ वर)*



















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महापालिकेसमोर २६ सप्टेंबर रोजी नागरिक करणार आत्मदहन

याकडे लक्ष देवून सांडपाण्याचा बंदोबस्त त्वरित करण्यात यावा अन्यथा विविध आंदोलने छेडण्यात येतील व भाजपाचे कार्यकर्ते अॅड. सलीम रंगरेज हे २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता महापालिका कार्यालयासमोर आत्मदहन करतील, असा इशारा देण्यात आला आहे.

### ड्रेनेज पाणी रस्त्यावर; नागरिकांच्या आरोग्याला धोका

जुना मंगळवार बाजार परिसरात ड्रेनेजचे पाणी संपूर्ण रस्त्याने वाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. या रस्त्यालगत विविध शाळा, हॉस्पिटल तसेच धार्मिक स्थळे असूनही महानगरपालिकेकडून या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे हा रस्ता जुनी महानगरपालिकेच्या अधिकारातील असूनही तातडीने उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. पावसाळा सुरू असल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. पावसाचे पाणी व ड्रेनेजचे पाणी एकत्र मिसळून रस्त्यावर साचत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाताना, रुग्णांना हॉस्पिटलमध्ये ये–जा करताना तसेच पादचारी व वाहनधारकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. परिसरात दुर्गंधी पसरली असून डास, माश्यांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या समस्येकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अल्पसंख्याक शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांनी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांकडे हलगर्जीपणा न करता त्वरित पावले उचलावीत, अन्यथा नागरिकांना तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# महापालिकेची कचरा संकलन व्यवस्था कोलमडली; कचऱ्याच्या विळख्यातून नगर शहराला मुक्त करावे

### सामाजिक संस्थांची महानगरपालिक आयुक्तांकडे मागणी

नगर – गेल्या काही महिन्यापासून महानगरपालिकेची कचरा संकलन व्यवस्था कोलमडली असून शहरात विविध ठिकाणी कचरा रस्त्याच्या कडेला पडून राहतो आहे. त्यामुळे नागरिकांना दैनंदिनपणे दुष्परिणामास सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगर शहरातील विविध सामाजिक संस्था, संघटना यांच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन त्यांच्याशी कचरा समस्येबाबत चर्चा करुन निवेदन देवुन नगरला कचऱ्याच्या विळख्यातुन मुक्त करण्याची मागणी करण्यात आली. यावर आयुक्त यांनी २० दिवसात नवीन कंत्राटसाठीची संपूर्ण निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन हि समस्या सुटेल. सध्या ५० घंटागाड्या दैनंदिनपणे कचरा संकलन करीत असून या गाड्यांमध्ये वाढ होऊन त्यांची संख्या ९० होईल आणि पुन्हा परिस्थिती पूर्ववत होईल. असे सांगून या प्रश्नानावर प्रशासन गंभीर असल्याचे म्हटले आहे.



शहरातील कचरा संकलन व्यवस्था करून कचऱ्याच्या विळख्यातून नगर शहराला मुक्त करा, या मागणीचे निवेदन विविध सामाजिक संस्था, संघटना यांच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

आयुक्तांबरोबर झालेल्या बैठकीत निवेदनावरील मुद्यांवरती तसेच इतर कचऱ्याच्या समस्येबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने घंटागाडीच्या माध्यमातून दैनंदिन होणारे कचरा संकलन पूर्ववत करण्यात यावे. घंटागाड्याची संख्या वाढवुन त्याचे नियोजन करावे. सार्वजनिक जागेवरील तसेच रस्त्यावर विविध ठिकाणी पडलेले कचऱ्याचे ढीग दैनंदिनपणे उचलून घेण्यात यावे. एकल वापराच्या प्लास्टिक वस्तू, कॅरीबॅग वरती बंदी असूनही त्याचा वापर शहरात सर्रासपणे सुरु आहे. या वस्तूंचा वापर, विक्री, वाहतूक व साठवणूक करणाऱ्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. शहरात आरोग्य विभागामार्फत नियमित औषध फवारण्याची व्यवस्था करावी. मोकाट कुत्रे रस्त्यावरती व मोकळ्या जागेत दैनंदिनपणे घाण (शौच) करीत असून या कुत्र्यांचा बंदोबस्त करुन ते करीत असलेली घाण स्वच्छ करण्याची व्यवस्था करावी. नाले व गटरी यांची दैनंदिनपणे स्वच्छता करून निर्जंतुकीकरण करावे. चौकात, उद्यानात तसेच रस्त्याच्या दुतर्फा काही भागात डस्टबिन लावण्याची व्यवस्था करण्यात यावी. आदी मागण्या लावून धरण्यात आल्या.

चर्चेत स्वच्छता रक्षक समितीच्या अध्यक्ष प्रतिमा धूत, हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर, राजेश परदेशी, दादासाहेब करंजुले, डॉ. सुधाताई कांकरिया, सौ. शुभा खंडेलवाल, प्रशांत दरेकर, संदीप कुसाळकर, संजय जोशी, संदीप ठोंबे, शुभा खंडेलवाल, ज्योती दीपक, नेहा जाजू, प्रभा खंडेलवाल, पल्लवी जोशी आदींनी सहभाग घेतला

यावेळी स्वच्छता रक्षक समिती, हरियाली संस्था, अहिल्यानगर सायक्लिस्ट असोसिएशन, नैतीक फाउंडेशन, निरंजन सेवाभावी संस्था युवान, ब्ल्यु जेम फाउंडेशन, इंडियन डेंटल असोसिएशन नगर ब्रँच, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनी, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊन, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्निटी, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटी, महेश्वरी युवा संघ, माझी बाग, सावली दिव्यांग संस्था, विकास प्रबोधिनी आदी सामाजिक संस्थांच्यावतीने ७०० नागरिकांच्या सह्यांचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले. तसेच निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री यांच्याकडेही पाठवण्यात आलेली आहे.



सीना नदीच्या पुलाला कठडे नसल्याने कल्याण रोड येथील नागरिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.

# कल्याण रोडवर सीना नदीवरील पुलाचे काम रखडल्याने नागरिकांचा जीव मुठीत घेऊन जुन्या पुलावरून प्रवास

नगर – सीना नदी वरील पुलाचे काम रखडलेले असल्याने आणि जुन्या पुलाची उंची कमी असल्याने कल्याण रोडवरील वाहतूक वारंवार ठप्प होत आहे. २४ सप्टेंबर रोजीही जुन्या पुलावर पाणी आल्याने कल्याण रोड येथील नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. नदीच्या पुलाला कठडे नसल्याने अपघात होण्याची शक्यता आहे.

सलग तिसऱ्या दिवशी सीना नदीचा रस्ता बंद असल्याने कल्याण रोड येथील नागरिकांच्या अडचणीत वाढ झाली आहे.महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. कल्याण रोडच्या नूतन पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने दुसरा पावसाळा उलटला तरी या पुलाचे काम झालेले नाही. कल्याण रोडच्या नागरिकांना अहिल्यानगर कडे येणारा सीना नदीचा पूल हा मुख्य रस्ता असल्याने नागरिकांचे हाल होत आहे. शाळेतील मुले, नोकरी करणारे वर्ग, शेतकरी वर्ग, व्यापारी, व्यावसायिक, अशा सर्वच लोकांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

भाळवणी, नेप्ती, आळेफाटा, मुंबई, कल्याण, ठाणे या ठिकाणी जाणारा हा मुख्य रस्ता असल्याने एसटीची वाहतूक ही ठप्प झाली आहे. सीना नदीच्या पुलाचे काम कधी होईल हा प्रश्न नागरिकांना पडला आहे.महापालिकेने माधवनगर येथून पर्यायी रस्ता मुरूम टाकून केला होता.परंतु वारुळाच्या मारुतीच्या रस्त्यावरील पुलावर पाणी येत असल्याने हा रस्ता ही बंद झाला आहे. विठाई लॉन्स,काटवण खंडोबा रोडवर मोठ्या प्रमाणात खड्डे, चिखलमय रस्ता झाल्याने केडगाव लिंकरोड येथून सात किलोमीटर अंतरावरून कल्याण रोड येथील नागरिकांना येजा करावी लागत आहे. सीना नदीच्या नूतन पुलाचे काम कधी होणार हा प्रश्न नागरिकांना पडला आहे. लवकरात लवकर सीना नदीचा पूल करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# पोलिस निरीक्षक प्रताप दराडेंना मागितली २ कोटींची खंडणी; तरुणीसह अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल

नगर – पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्याविरूध्द तरूणीने अत्याचाराचा गुन्हा दाखल केल्यानंतर दराडे यांनी २३ सप्टेंबरला सायंकाळी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात संबंधीत तरूणीसह तिला मदत करणार्या अनोळखी व्यक्तीविरूध्द फिर्याद दिली असून त्यानुसार खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दराडे यांच्या नातेवाईकांच्या मुंबईतील हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट म्हणून काम करणाऱ्या तरूणीसोबत त्यांची ओळख झाली. काही महिन्यांतच ओळख जवळीक झाली आणि तिने वैयक्तिक कारणास्तव दराडे यांच्याकडून वेळोवेळी पैसे उकळले. २ लाख १० हजार रुपयांहून अधिक रक्कम वेगवेगळ्या कारणांनी दराडे यांच्याकडून तरूणीने घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, दराडे यांनी तरूणीशी साधलेली जवळीक त्यांना अडचणीची ठरली. तरूणीने त्यांना हळूहळू धमक्यांचा सूर चढवत तुम्हाला हनीट्रॅपमध्ये अडकवीन, खोटी अत्याचाराची केस करीन अशा थेट धमक्या द्यायला सुरूवात केली.

केवळ धमक्या न देता आधी २ कोटी व नंतर १ कोटी रुपयांची सरळसरळ मागणी करण्यात आली. १६ सप्टेंबर रोजी तर थेट कोतवाली पोलीस ठाण्यात येऊन दोन कोटी रूपये द्या नाहीतर सर्वांसमोर हार घालून लग्न करा, नाहीतर अत्याचाराचा गुन्हा दाखल करीन, अशी धमकी दिली.

दरम्यान, तरूणीच्या धमक्यांचे पुरावे व्हॉट्सअॅप चॅट, कॉल रेकॉर्ड व सीसीटीव्हीत असल्याचा दावा दराडे यांनी फिर्यादीत केला आहे. तरूणीने सोमवारी तोफखाना पोलीस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल केल्यानंतर दराडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली.

संबंधीत तक्रारीची चौकशी अपर पोलीस अधीक्षक यांनी करून गुन्हा दाखल करण्यासंदर्भात आदेश दिल्यानंतर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## नगर – पुणे महामार्गावर अपघात; वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

नगर – रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना नगर पुणे महामार्गावर सुपा गावात घडली. सकुबाई बबन भालेकर (वय ६५, रा. सुपा, ता. पारनेर, मूळ रा. चोंभुत, ता. पारनेर) असे मयत महिलेचे नाव आहे.

याबाबत मयताची मुलगी मीना बबन भालेकर (रा. उल्हासनगर, ठाणे) यांनी २३ सप्टेंबर रोजी सुपा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या आई या २० सप्टेंबर रोजी दुपारी १.४५ च्या सुमारास सुपा गावातील समाजमंदिरासमोर नगर पुणे महामार्ग ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. त्यात त्या गंभीर जखमी होवून मयत झाल्या. अपघातानंतर वाहन चालक वाहनासह पसार झाला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## किरणबाई बाफना यांचे दु:खद निधन



जामखेड – येथील श्रीमती किरणबाई संपतलाल बाफना (वय ७२) यांचे २४ सप्टेंबर रोजी निधन झाले. जामखेड अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. जामखेड येथील व्यापारी महावीर व गौतम बाफना यांच्या त्या मातोश्री होत.

## रेवजी कोतकर यांचे वृद्धापकाळाने निधन



निंबळक – नगर तालुक्यातील निंबळक येथील रेवजी रामजी कोतकर (नाना) (वय ९४) यांचे २१ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर २२ सप्टेंबर रोजी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सैन्य दलातील सेवानिवृत्त बीएसएफ हवालदार आबासाहेब व स्व. भाऊसाहेब कोतकर यांचे ते वडील तर जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य अविनाश कोतकर व ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नितीन कोतकर यांचे ते आजोबा होत. एमआयडीसी येथील साईरत्न हॉटेलचे ते संचालक होते.

## प्रकाश (सोनू) नारा यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील प्रकाश (सोनू) अमरलाल नारा (वय ४१) यांचे हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई – वडील, पत्नी, २ भाऊ, मुलगा, २ मुली, चुलत बंधू असा परिवार आहे. बस स्थानक समोरील प्रकाश मोबाईल वॉचचे मालक अमरलाल उद्धवदास नारा यांचे थोरले चिरंजीव, कैलास (राजा) व सुनिल (गुड्डू) नारा यांचे बंधू, जगदीश व प्रेमचंद नारा यांचे चुलत बंधू होत.

# हनुमान मंदिराची विटंबना करणाऱ्यांचा तातडीने तपास लावावा अन्यथा 'तीव्र आंदोलन' करणार

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील ग्रामदैवत पूर्वमुखी हनुमान मंदिरात मूर्तीच्या चौथऱ्यावर पाठीमागील बाजूस अज्ञात समाज कंटकाने मांसाचे तुकडे ठेवून विटंबना केल्याचा प्रकार उघडकीस येवून ३ दिवस झाले तरी आरोपींचा तपास लागलेला नाही. या आरोपींना तातडीने पकडण्यात यावे अन्यथा नगर – दौंड महामार्गावर रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. याबाबत नगर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने यांना निवेदन देण्यात आले आहे.



हनुमान मंदिरात विटंबना करणाऱ्या आरोपींचा तातडीने शोध घ्यावा या मागणीचे निवेदन नगर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने यांना देताना सारोळा कासार ग्रामस्थ. (छाया – बबलू शेख)

मंदिरात विटंबना करून धार्मिक भावना दुखावण्याचा प्रकार २२ सप्टेंबर रोजी सकाळी निदर्शनास आला होता. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरलेले आहे. गावच्या वेशीबाहेरच पुर्वामुखी हनुमान मंदिर आहे. या ठिकाणी सकाळी दर्शनाला गेल्यावर हा प्रकार काहींच्या निर्दशनास आला. त्यामुळे गावात संतापाचे वातावरण पसरले, अनेक ग्रामस्थ, तरुण मोठ्या संख्येने मंदिराजवळ जमा झाले. पोलिसांना याबाबतची माहिती दिल्यानंतर नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते हे मोठ्या फौजफाट्यासह गावात दाखल झाले. काही वेळातच नगर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने हे ही फौजफाट्यासह गावात आले. रॅपीड अॅक्शन फोर्स ची तुकडीही आली. पोलिस अधिकाऱ्यांच्या समोर ग्रामस्थांनी आक्रमक पणे आपल्या संतप्त भावना व्यक्त करत आरोपीला तातडीने पकडण्याची मागणी केली. पोलिस अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना शांततेचे आवाहन करत आम्ही तपास सुरु केला असून आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात विष्णु विजय खोसे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात समाजकंटकाविरुद्ध गुन्हा दाखल झालेला आहे. याचा तपास स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे करत आहेत.

गावात इतिहासात पहिल्यांदाच अशी घटना घडल्याने गावातील शांतता, ऐक्य व बंधुभाव याला बाधा आणण्याचा प्रयत्न झाला आहे. या घटनेला ३ दिवस झाले तरी आरोपीचा शोध न लागल्याने २४ सप्टेंबर रोजी ग्रामस्थ गावात एकत्र जमा झाले. त्यानंतर त्यांनी जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन देण्याचा निर्णय घेत नगर गाठले. पोलिस अधिक्षक दौऱ्यावर असल्याने पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने यांना निवेदन देत आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# सरपंचावर राजकीय दबावापोटी अपात्रतेची कारवाई अन् हद्दपारीची नोटीस; सखोल चौकशी करून कारवाई मागे घेण्याची महाविकास आघाडीची मागणी

नगर – नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावचे सरपंच आणि महाविकास आघाडीचे नेते शरद खंडेराव पवार यांच्यावर राजकीय दबावापोटी अपात्रतेची कारवाई करण्यात आली असून आता त्यांना हद्दपारीची नोटीस देण्यात आली आहे. या प्रकारची सखोल चौकशी करून या दोन्ही कारवाया तातडीने मागे घेण्याची मागणी महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.



सरपंचावर राजकीय दबावापोटी केलेली अपात्रतेची कारवाई अन हद्दपारीची दिलेली नोटीस याचा सखोल तपास करून दोन्ही कारवाया मागे घेण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे देताना खा. निलेश लंके व महाविकास आघाडीचे पदाधिकारी.

यावेळी खा.निलेश लंके, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, युवसेनेचे विक्रम राठोड, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ, संपतराव म्हस्के, माजी सभापती प्रवीण कोकाटे, बाबासाहेब गुंजाळ, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र भगत, डॉ. मारुती ससे, आबासाहेब कोकाटे आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या निवेदनात म्हंटले आहे की, सरपंच शरद खंडेराव पवार यांना २२ ऑगस्ट रोजी अर्जदाराच्या बोगस बनावट अर्ज व अतिक्रमण संदर्भातील गटविकास अधिकारी अहिल्यानगर यांच्या चौकशी समिती अहवालाचे कुठल्याही प्रकारचे अवलोकन न करता आजपर्यंत सदर अर्जातील नमूद ठिकाणच्या तिन्ही जागावरील अतिक्रमणाची नोटीस नसताना, अतिक्रमण निश्चिती नसताना, भूमी अभिलेख कार्यालय हद्द निश्चिती नसताना, कुठलाही कागदपत्रे पुरावा नसताना, बेकायदेशीर अपात्रितेची कारवाई झाली आहे. त्यानंतर पोलीस उपविभागीय कार्यालय अहिल्यानगर यांच्याकडून १९ सप्टेंबर रोजी सरपंच पवार यांना जिल्हा हद्दपारची नोटीस देण्यात आलेली आहे.

सदर दोन्ही प्रकरणे राजकीय दबावापोटी करण्यात आलेले आहेत. सरपंच पवार यांनी मागील १० वर्षापासून ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, सरपंच या पदावर व बाजार समिती, पंचायत समिती या निवडणुका लढवल्याने व आंदोलनाच्या माध्यमातून अनेकांना न्याय मिळवून दिलेले आहेत, त्यांचा समाजकारण व राजकारणातील वाढता प्रभाव पाहता,व पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राजकीय विरोधकांनी, सत्ताधाऱ्यांच्या माध्यमातून ही बोगस बनावट कारवाई कटू कारस्थान अधिकाऱ्यांना करावयाला लावलेले आहे.

सत्ताधारी व अधिकारी सर्वसामान्यांचे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदिल आहे शेतकरी आत्महत्या थांबायला तयार नाही, याच्याकडे लक्ष न देता महाविकास आघाडीचे कार्यकर्ते सर्वसामान्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडणाऱ्यांचा खोट्या कारवाया करून आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहेत.

तरी याबाबत सखोल चौकशी करून दोन्ही कार्यवाही मागे घेण्यास व नगर शहर व तालुक्यातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांवर बोगस बनावट गुन्हे दाखल करून विविध बोगस कारवाया थांबण्यासाठी त्वरित आदेश द्यावेत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

कांद्यातील अँटी बॅक्टेरिअल आणि अँटी वायरल तत्त्वांमुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. रात्री झोपताना पायमोजे घालून त्यात कांद्याच्या चकत्या ठेवण्याने शरीरातल्या घातक जिवाणूंचा आणि किटाणूंचा नाश होतो, तसेच रक्तशुद्धी साधते. कांद्यामधील फॉस्फरिक ॲमसिड रक्तामध्ये शोषलं जातं आणि रक्तशुद्धी होते. कांद्याच्या उग्र वासामुळे खोलीतील हवा शुद्ध होतेच पण पायाची दुर्गंधीही नाहिशी होते.

## पाककला

### खांडवी

**साहित्य** – १ वाटी तांदळाचा रवा, १ वाटी साखर किंवा गूळ, आले कीस २, ३ चमचे, २ वाट्या नारळाचे दूध, पाव चमचा वेलदोड्यांची पूड, तूप, चिमूटभर मीठ, थोडा रोझ इसेन्स किंवा गुलाबपाणी

**कृती** – तांदूळ धुऊन कपड्यावर पसरून वाळवावे. नंतर त्यांचा रवा काढावा. तुपावर रवा चांगला भाजून घ्यावा. नारळाच्या दुधात साखर विरघळून घ्यावी. दुधाला उकळी आली की त्यात वाटलेले आले, मीठ व भाजलेला रवा घालावा इसेन्स व वेलदोड्यांची पूड घालावी. चांगले ढवळून झाकण ठेवावे. गॅस मंद ठेवावा. नंतर बाजूने थोडे तूप सोडून ढवळावे व तूप लावलेल्या थाळीत घालून थापावे. वरून थोडे ओले खोबरे घालून थापावे. गार झाल्यावर मोठ्या वड्या पाडाव्यात.

## वास्तू

* रोज जेवणापूर्वी वास्तू पुरुषासाठी वेगळा नैवेद्य आठवणीने दाखवावा.

* घरात जास्तीत जास्त शांतता ठेवण्याचा प्रयत्न करावा. तसेच घर आणि घराचा परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवावा.

* रोज घरात रामरक्षा आणि हनुमान स्तोत्र मोठ्याने म्हणावे.

* घराचे मुख्य दार नेहमी स्वच्छ ठेवा. रात्रीच्या वेळीही मुख्य प्रवेशद्वारावर पुरेसा प्रकाश असावा.

* शक्य असल्यास, प्रवेशद्वारावर थोडा उंच लाकडी उंबरठा बनवा. ज्यामुळे बाहेरचा कचरा आत येणे थांबेल. कचऱ्यामुळे वास्तुदोषही वाढतात.

* मुख्य प्रवेशद्वारावर गणेशाची मूर्ती किंवा चित्र किंवा स्टिकर इत्यादी लावता येतात. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही दारावर ओम देखील लिहू शकता. दारावर शुभ चिन्हे बनवल्याने घरावर आशीर्वाद राहतात.

* घराभोवती जर कोणतेही कोरडे झाड किंवा बुंधा असेल तर ते ताबडतोब काढून टाकावे. यामुळे वास्तुदोष वाढतात.

## सल्ला

* मुलांची रोगप्रतिकारकशक्ती वाढावी यासाठी तुळशीची पाने ५ ते १० रोज स्वच्छ धुवून खाण्यास द्यावी.

* उन्हाळ्यात स्वयंपाक करताना गरम वाफ बाहेर काढण्यासाठी चिमणी आणि एक्झॉस्ट फॅनचा वापर करावा.

* शक्य असल्यास, स्वयंपाकाचा वेळ कमी करण्याचा प्रयत्न करा. उदा. जास्त वेळ लागणाऱ्या पदार्थांची तयारी आधीच करा.

## सौंदर्य

* आवळा, रिठा व शिकेकाईची पेस्ट बनवून केसांना लावा व नंतर धुवा–ॲलोव्हेरा जेल केसांना १५ मिनिटं लावून ठेवा व नंतर धुवा.

* केस धुतल्यानंतर ते असेच बांधून ठेवण्यापेक्षा कंगव्याने केस विंचरून केसातील गुंता सोडवून घ्यावा. केसातील गुंता वेळीच यामुळे केस एकमेकांत अडकून तुटत नाहीत. त्यामुळे केस धुतल्यानंतर सर्वात आधी केसांचा गुंता सोडवावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५

**विनायक चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, स्वाती १९।०९, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : अपेक्षेनुसार कार्ये होतील. आरोग्य उत्तम राहील. मित्रांपासून, सहकाऱ्यांपासून लाभ मिळेल. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**वृषभ** : महत्वाच्या व्यक्तींशी संपर्क येईल. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखद. सामाजिक स्थितीत सुधारणा होईल.

**मिथुन** : राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील. काम व इच्छित योजनेला अमलात आणावे.

**कर्क** : कौटुंबिक जीवनात आनंद मिळेल, पण खाण्या–पिण्याच्या बाबतीत काळजी घ्या. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा.

**सिंह** : नवीन कामे, योजनांच्या बाबतीत स्थिती लाभदायक राहील. घरात किंवा कुटुंबात शुभप्रसंग घडतील.

**कन्या** : आपल्या मुक्कामापर्यंत पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम आणि धैर्याची आवश्यकता आहे. अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील.

**तूळ** : व्यापार–व्यवसायात स्थिती सुखद राहील. आरोग्य नरम–गरम राहील. व्यापार–व्यवसायात वातावरण अनुकूल मिळेल.

**वृश्चिक** : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. आपले काम धाडसाने करा. काही नवीन संधी मिळतील.

**धनु** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.


**मकर** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे. आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**कुंभ** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल. घरातील वातावरण आनंददायी राहील.

**मीन** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२७० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२६९ चे उत्तर



**आडवे शब्द** :– १) बोभाटा; गडबड ५) विश्रांती; विश्राम; आराम ८) महाराष्ट्राचे एक माजी व दिवंगत मुख्यमंत्री १०) कडक कवच असलेले एक फळ ११) ज्याला वंदन करावे असा १४) नेहमी; हमेशा १५) कंटाळवाणे १६) पहिली ते दहावीपर्यंतमधील एक इयत्ता १९) गावाचा मुख्य अधिकारी २०) जामीन; हमी; प्रतिभू २३) हालचाल

**उभे शब्द** :– १) आटोका; ताकत; हाताची वेंध २) महाराष्ट्राचे एक माजी व दिवंगत मुख्यमंत्री ३) गेलेला; भूत; अवस्था; दशा ४) वेगाने वाहणारी हवा ५) वाचून; शिवाय ६) शिर्डीचे संत – ++बाबा ७) धागा; तंतू; दोरा ९) पाट्यावर चटणी वगैरे ज्याने वाटतात तो लंबगोल दगड १०) एक प्रवासी वाहन १२) सैन्य; झाडाचे पान; अर्धा भाग १३) कुबेराचे सेवक १५) दही घुसळून ताक करण्याचे लाकडी साधन १७) चालू नाणे; चरित्र; वर्तणूक १८) माहिती; समज; जाण; आकलन शक्ती १९) एक विषम संख्या; पांडवांची संख्या २०) पाणी; नीर; जीवन २१) गळ्याची मागची बाजू; आदर २२) अंदाज; अनुमान; अदमास

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : परिश्रमातच मनुष्याची माणुसकी आहे. – **विनोबा भावे.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नेलकटरमध्ये २ चाकू का असतात? त्यांचा वापर काय?

दात घासणे, आंघोळ करणे आणि नखे कापणे ही आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची कामे आहेत. त्याचप्रमाणे नखे स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे कारण नखांच्या माध्यमातूनच जंतू थेट तोंडातून आपल्या पोटात जाऊ शकतात. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. कधीकधी ते अनेक रोगांसाठी कारणीभूत ठरते.

जास्त नखे चावल्याने हानिकारक जीवाणू आणि विषाणू तोंडातून बोटांपर्यंत आणि नखांपासून तुमच्या चेहऱ्यावर पसरू शकतात. यामुळे संसर्ग होण्याचा धोका वाढतो. या वाईट सवयीपासून मुक्त होण्यासाठी अनेकजण खूप प्रयत्न करतात, पण ही सवय सहजासहजी सुटत नाही.

नखे कापण्यासाठी आपण नेल कटर वापरतो. पण, नेल कटरमध्ये चाकूसारखे दोन ब्लेड असतात. पण ती कशासाठी असतात याचे उत्तर आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नसेल. यामागील एक महत्त्वाचे कारण जाणून तुम्ही थक्क व्हाल.

नेल कटरमध्ये मध्यभागी दोन चाकू सारखी रचना असते ज्याचा आवश्यकतेनुसार वापर केला जाऊ शकतो. या प्रकारच्या चाकूचा वापर नखे कापण्यासाठी आणि इतर अनेक कामांसाठी केला जाऊ शकतो.

नेल कटरमध्ये दोन ब्लेड जोडल्यानंतर त्याची उपयुक्तता वाढते. तुम्ही ते कुठेही सोबत घेऊन जाऊ शकता. कारण ते खूपच लहान असते, तसेच अनेक कारणांसाठी वापरले जाऊ शकते. हे बाटलीचे झाकण उघडण्यासाठी, ड्रिलिंग करण्यासाठी आणि एखादी गोष्ट, वस्तू कापण्यासाठी केला जाऊ शकतो. आपल्यापैकी बहुतेकांकडे नखे स्वच्छ करण्यासाठी धारदार ब्लेड असलेले नेल क्लिपर असते. छोट्या गोष्टी हाताळणे हे त्याचे कार्य आहे. एवढेच नाही तर बाटलीचे झाकण उघडण्यासाठीही याचा वापर करता येतो.

अनेकदा कपड्यामध्ये छोटा धागा निघतो. त्यामुळे हा धागा तोडण्यासाठी तो अनेकदा लोक खेचतात. त्यामुळे कपड्याची पूर्ण शिलाईच उसवते. परिणामी ते कपडे खराब होतात. तुमच्याबाबतीत कधी ना कधी असं घडलं असेल. पण तुमच्या बॅगेत नेल कटर असेल तर तुम्ही धागा खेचण्याऐवजी तो नेल कटरने कापू शकता. त्यामुळे शिलाई उसवणार नाही. आणि तुम्हाला हवा तेवढा धागा कापता येऊ शकतो.

आपण कपडे खरेदी करतो तेव्हा प्रत्येक कपड्याला दोन दोन तीन तीन टॅग असतात. हे टॅग प्लास्टिक किंवा धाग्याने बांधलेले असतात. विशेष म्हणजे हा धागा अत्यंत पक्का असतो. तुम्ही हाताने कितीही तोडण्याचा प्रयत्न केला तर तो तुटत नाही. उलट धाग्याने हात कापण्याची अधिक शक्यता असते. त्यामुळे तुम्ही हा धागा कापण्यासाठी नेल कटरचा वापर करू शकता. नेल कटरने हा धागा झटक्यात कापून तुम्ही टॅग हटवू शकता.

तुम्ही बाहेर आहात आणि तुम्हाला थंड पेयाच्या किंवा एखाद्या बॉटलचं झाकण उघडायचं असेल तर कधीच ते दाताने उघडू नका. चुकूनही तशी चूक करू नका. त्यामुळे दातांना इजा होण्याची किंवा दात पडण्याची शक्यता अधिक असते. दात हलण्याची शक्यताही अधिक असते. अशावेळी तुम्ही तुमच्यासोबत नेहमी नेल कटर ठेवा. नेल कटर ओपनरचं कामही करतो. त्यामुळे तुम्ही काही सेकंदात बॉटलचं झाकण उघडू शकता. नेल कटरला एक छोटा अटॅचमेंट असतो. त्याने तुम्ही सहजपणे बाटलीचं झाकण उघडू शकता.

आपण नेहमीच चाव्या ठेवण्यासाठी की–चेन ठेवतोच ठेवतो. तुम्हाला वाटलं तर तुम्ही नेल कटरचा की–चेनसारखा वापर करू शकता. छोट्या साईजचं नेल कटर की–चेन म्हणून वापरता येईल. मार्केटमध्ये असे छोटे नेल कटर मिळतात. ते तुम्ही खरेदी करू शकता.

## कर्तव्य

राज्यकारभारापेक्षा इतर अवांतर गोष्टीत रस घेणाऱ्या एका राजाने आपल्या सेनापतीला दोन प्रश्न विचारले व उत्तरे देण्यासाठी त्याला एका आठवड्याची मुदत दिली. सेनापतीने आपल्याच चेहऱ्या मोहोऱ्याच्या आपल्या एका सेवकाला आपला पोषाख घालायला देऊन, आणि त्या प्रश्नांची उत्तरे पढवून, राजाकडे पाठविले. 'हा आपला सेनापतीच आहे' अशा समजुतीनं राजानं त्याला विचारलं, 'काय सेनापतीसाहेब? मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तयार आहेत का?' नकली सेनापती म्हणाला, 'महाराज ! ते प्रश्न आपण पुन्हा विचारलेत तर बरे होईल.' राजा – समोरच्या पर्वताची माती एकूण किती टोपल्या होईल ? नकली सेनापती – त्या पर्वताच्या एकूण क्षेत्रफ़ळाच्या एक दशांश आकाराची जर एक टोपली बनवली, तर त्या पर्वताची एकूण माती दहा टोपल्या होईल.

राजा म्हणाला, वा: ! अगदी बरोबर आहे उत्तर. सेनापतीसाहेब ! आता माझ्या मनात काय आहे ते सांगा. नकली सेनापती म्हणाला, सध्या तुमच्या मनात तुम्ही सेनापतीशी बोलत आहात असं आहे; पण मी खरा सेनापती नसून, सेनापतीच्या सोंगात तुमच्याकडे आलेला सेनापतीसाहेबांचा नोकर आहे. मग तुम्ही दोघांनी मला असं का फ़सवलं ? राजा म्हणाला.

माझ्या धन्याचं असं म्हणणं आहे की, जे माणसं मोठ्या पदांवर आहेत, त्यांनी मनोरंजनाच्या भलत्यासलत्या गोष्टीत वेळ वाया घालवू नये. राजाचं कर्तव्य राज्य उत्तम तऱ्हेनं चालविण हे आहे, तर सेनापतीचं कर्तव्य राज्याचं उत्तम तऱ्हेने रक्षण करणे हे आहे. अशा अशा स्थितीत आपण त्यांना नसते प्रश्न विचारुन त्यांच मन त्यांच्यापुढे असलेल्या मुख्य प्रश्नांवरुन उडवून भलत्याच प्रश्नांकडे वेधता. त्यांना आपलं हे वागणं मान्य नसल्यामुळे, त्यांनी आपल्या मामुली प्रश्नांची उत्तर देण्यासाठी माझ्यासारख्या मामुली सेवकाला सेनापतीचं सोंग घेऊन पाठविलं.' नकली सेनापतीच्या या खुलाशानं राजा वरमला आणि मनोरंजनाच्या बाबींतून लक्ष काढून त्याने ते राज्यकारभारात घातले.

तात्पर्य : मनोरंजनात वेळ न घालवता आपले मुख्य कर्तव्य बजावणे हेच महत्त्वाचे आहे.

## जीवन का अमृत (भाग १)



जब महापुरुष की दया हम पर हो जाती है, तो जो दसवाँ द्वार है, वह खुल जाता है। जब हम अंतर में रोशनियाँ देखने के बाद गुरु के नूरी स्वरूप के दर्शन करते हैं, तो वे हमें आगे के मंडलों में ले जाते हैं, दसवाँ द्वार खोल देते हैं। गुरु के ज़रिये ही हम अंदर के मंडलों में जाते है ।

**दया बिन खुले न बज्र किवाड़।**

जब महापुरुष की दया हम पर हो जाती है,

### गुरू और परमात्मा

तो जो दसवाँ द्वार है, वह खुल जाता है । जब हम अंतर में रोशनियाँ देखने के बाद गुरू के नूरी स्वरुप के दर्शन करते हैं, तो वे हमें आगे के मंडलों में ले जाते हैं, दसवाँ द्वार खोल देते है । गुरू के जरिये ही हम अंदर के मंडलों में जा सकते हैं। गुरु हमें शरीर से ऊपर उठाकर सबसे पहली मंज़िल, सहस्र–दल–कवल में पहुँचा देते हैं।

जब तक हम संत की संगत नहीं करते हैं, किसी महापुरुष के सत्संग में नहीं पहुँचते हैं, तब तक हममें पात्रता पैदा नहीं होती। जब तक हममें पात्रता नहीं होगी, हम प्रभु की ओर आकर्षित नहीं होंगे। पात्रता हममें तब आती है, जब किसी महापुरुष की दया–मेहर हम पर हो। आगे स्वामीजी महाराज फ़रमा रहे हैं :

**सुरत बिन होय न शब्द सम्हार ।**
**निरत बिन होय न धुन आधार ।।**

यहाँ स्वामी जी महाराज सुरत और निरत के रास्ते की बात कर रहे हैं। हमारे अन्दर दो शक्तियाँ हैं– एक सुरत की, दूसरी निरत की। (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

**१२) गन्ने की फसल : जमीन को शक्तिशाली बनाने के लिए** – १. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद या हरी खाद जमीन में मिलाकर बीज बुवाई के लिए जमीन तैयार करें।

२. बीज बुवाई से पहले एक बार सरी में ६० किलो अनाज की खाद एक एकड़ जमीन में मिला दें। फिर फसल ४ मास की होने के बाद भरनी करते समय (मिट्टी चढ़ाते समय) ६० किलो और बारिश के समय (जून मास) में ६० किलो अनाज की खाद जमीन में मिलायें।

३. फसल ४ मास की होने बाद भरनी करते समय (गन्ने को मिट्टी चढ़ाते समय) एक एकड़ जमीन १२ में (जमीन गीली हो तब) एक टन केंचुवे की खाद जमीन में मिलायें।

### आज्ञा चक्र

४. बीज बुवाई के समय एक एकड़ के लिए २०० ली. जीवामृत पानी के साथ या जमीन गीली हो तब । छोड़ दें। फिर मास में एक– एक बार ऐसे एक साल तक २००–२०० ली. जीवामृत पानी के साथ या ड्रिप द्वारा छोड़ दें या जमीन गीली हो तब छिड़कायें।

५. गन्ने की भरनी करते समय (मिट्टी चढ़ाते समय) और जून मास में ऐसे दो बार जीवामृत में एक किलो अँझोटोबॅक्टर जीवाणु संवर्धक या अँझोस्पिरीलियम जीवाणु संवर्धक, पी.एस.बी. जीवाणु संवर्धक एक किलो और पालाश की उपलब्धि कराने वाले जीवाणु संवर्धक एक किलो मिलाकर पानी के साथ या जमीन गीली हो तब छोड दें।

**वीज संस्कार** – २०० ली. बीजामृत में एक किलो ट्रायकोडर्मा, २ किलो अँझोटोबॅक्टर और २ किलो पी.एस.बी. जीवाणु संवर्धक मिलाकर उसमें आधा घण्टा तक बीज को डुबोकर रखें फिर बुवाई करें। **फसल संरक्षण** – १. रस चूसनेवाली कीट तथा तना के अंदर आनेवाली कीटों के नियंत्रण के लिए ४% गोमूत्र, ५% नीम अर्क या दशपर्णी अर्क में से एक अदली बदली कर फंवारें।

२. मावा तथा मिलीबग्ज के लिए ३० ग्राम व्हर्टिसिलीयम पाउडर, ५० मि.ली. दूध १५ ली. पानी में मिलाकर छिड़काव करें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सर : 'त्याने भांडी घासली' आणि 'त्याला भांडी घासावी लागली' या दोन वाक्यात काय फरक आहे?

गण्या : 'पहिल्या वाक्यात कर्ता अविवाहीत आहे आणि दुसऱ्या वाक्यात कर्ता विवाहीत आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ब्राह्मोज् क्रूज क्षेपणास्त्राचे नौदलाच्या आवृत्तीचे यशस्वी परिक्षण कोठून करण्यात आले? – विशाखापट्टणम्

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

दोन चमचे आवळा रस आणि दोन चमचे दुर्वारस घ्यायला सांगितला. अति रक्तस्राव होणे हे अपानवायूची दुष्टी झाल्याचे लक्षण होते. ती कमी होण्यासाठी चंदनबलालाक्षादी तैलाची मात्रा बस्ती तिला सुरू केली.

आठ दिवसांतच रीयामध्ये चांगला फरक दिसला. रक्तस्राव थांबल्यामुळे ती आनंदी व उत्साही दिसत होती.

अशा प्रकारे चंदनबलालाक्षादी तेलाची मात्रा बस्ती, पथ्यकर आहारविहार, प्रवाळभस्म, कामदुधा वटी, लोध्रासव, महामंजिष्ठादी काढा या रक्तस्तंभक, रक्तशुद्धीकर व पित्तघ्न असा औषधोपचार करून रीया पूर्णपणे बरी झाली.

आयुर्वेदामध्ये औषधोपचाराबरोबरच पथ्याला

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

किती महत्त्व आहे हे वरील उदाहरणावरून आपल्या लक्षात येईल. जेथे हार्मोनल थेरपी देऊनही फरक पडत नाही, तिथे आयुर्वेदिक औषधोपचारांनी व पंचकर्म चिकित्सेने उपशय मिळतो, असा अनुभव आहे

**रुग्णानुभव** –

**४ अत्यार्तव व फायब्रॉईड** (Uterine Fibroid) : जोशी काकू प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. गेल्या पाच–सहा वर्षांपासून त्यांना अतिरक्तस्रावाचा त्रास होत होता. त्रास झाल्यावर इंजेक्शन व औषधे घेऊन तेवढ्यापुरता आराम वाटत असे. मी नेहमी त्यांना म्हणायचे, अहो काकू, तुम्ही एकदा तरी सोनोग्राफी करून घ्या. तुम्ही पंचेचाळिशी गाठली आहे. वयानुसार एकदा तरी रक्त, लघवी व सोनोग्राफी करायला हवी. सोनोग्राफी केल्यानंतर त्यांच्या गर्भाशयामध्ये गाठी (फायब्रॉईड) आहेत हे लक्षात आले. गर्भाशयाच्या पुढील बाजूच्या त्वचेमध्ये (Intramural) गाठ झाली होती. त्या फायब्रॉईडचा आकार हा ४८ मिमी २५ मिमी एवढा होता. काकूंचे वय व त्यांना होणाऱ्या त्रासाचा विचार करून त्यांना गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**सर्व विषय एकमताने मंजूर, केलेल्या समाजाभिमुख कामांची पावती बडीसाजन ओसवाल श्री संघाला समाज सहकार्यातून देत आहे : पेमराज बोथरा**



श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना अध्यक्ष पेमराज बोथरा. समवेत उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, खजिनदार मिलिंद जांगडा, सहसचिव अनिल लुंकड आदींसह सर्व संचालक उपस्थित होते.

नगर – बडीसाजन समाजाचे बऱ्याच वर्षांपासूनचे स्वप्न सॉलीटियर या नव्या व भव्य सांस्कृतिक भवनाच्या माध्यमातून पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी समाजातून फार मोठा हातभार मिळाला. त्यामुळेच मुदती आधीच हा प्रकल्प पूर्णत्वास गेला. बडीसाजन ओसवाल श्री संघ करत असलेल्या समाजाभिमुख कामची पावती सर्व समाजाने सहकार्य करून देत पाठीवर थाप मारली आहे. यामुळे अधिक प्रेरणा मिळत आहे. सर्व पदाधिकाऱ्यांनी केलेल्या उत्कृष्ट टीमवर्क मुळेच संस्था प्रगतीपथावर आहे, असे प्रतिपादन बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांनी केले.

श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाली. यावेळी उपस्थित सभासदांनी विषय पत्रीकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर केले. सभेस संस्थेचे उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, सहसचिव अनिल लुंकड, खजिनदार मिलिंद जांगडा, सहखजिनदार दीपक बोथरा व सर्व संचालक आदींसह समाजातील नागरिक उपस्थित होते.

पेमराज बोथरा पुढे म्हणाले, स्व.विलासभाऊ लोढा यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी समाजातील गरजू कुटुंबीयांसाठी बोथरा परिवाराच्या वतीने केडगाव येथे उभारण्यात येत असलेल्या घरकुल अपार्टमेंट पूर्णत्वास आले आहे. लवकरच हे घरकुले लाभार्थींना देण्यात येणार आहेत. संस्थेच्या वतीने समाजातील दुर्बल घटकांच्या मदतीसाठी सुवर्ण कमळ योजनेतही वाढ केल्याने समाजातील नागरिकांना याचा मोठा आधार निर्माण झाला आहे. बडीसाजनच्या युवक संघाचेही काम कौतुकास्पद असून समजाच्या प्रत्येक कार्यात ते तत्पर असतात.

वार्षिक सभेत समाजाच्या विविध उपक्रमांना सातत्याने सहकार्य करणारे संस्थेचे अध्यक्ष पेमराज बोथरा, संतोष बोथरा, सतीश बोथरा, संस्थेचे उपाध्यक्ष अजित कर्नावट, ॲड. राजेंद्र बलदोटा, दिलीप बोरा, प्रीतेश दुग्गड व दिलीप कर्नावट आदींचा सत्कार करण्यात आला.

माणिकनगर येथील बडीसाजन मंगल कार्यालयाच्या बँक्वेट हॉलचे नूतनीकरण करणार असून भव्य ४०० आसन व्यवस्थेसह अत्याधुनिक व आकर्षक वातानुकूलित हॉलच्या कामास सभासदांनी एकमुखी मंजुरी दिली. या कामासाठी अध्यक्ष पेमराज बोथरा परिवार व उपाध्यक्ष अजित कर्नावट परिवार यांनी पूर्णपणे सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

प्रारंभी वार्षिक सभेचे प्रास्ताविक संचालक मनोज शेटिया यांनी केले. सचीव विशाल शेटिया यांनी संस्थेच्या कार्याची सविस्तर माहिती देऊन सूत्रसंचालन केले. खजिनदार मिलिंद जांगडा यांनी इतिवृत्त व ताळेबंद मांडला. उपाध्यक्ष अजित कर्नावट यांनी आभार मानले. या सभेस बडीसाजन संघाचे संचालक धरमचंद कोठारी, पोपटलाल कटारिया, नरेंद्र चोरडिया, राजेंद्र ताथेड, नरेंद्र बाफना, राजेंद्र बोथरा, पोपट लोढा, किरण भंडारी, युवक संघाचे धीरज लोढा आदींसह सभासद उपस्थित होते.



आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी पंकज लोखंडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी पंकज लोखंडे यांची नियुक्ती



नगर – आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी पंकज राजेंद्र लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृह येथे नुकत्याच झालेल्या संघटनेच्या बैठकीत जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या वेळी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रविराज साबळे व पुणे जिल्हा उपाध्यक्ष विकास दंडवते यांनी लोखंडे यांच्या नियुक्तीची घोषणा करून त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. या बैठकीत जिल्हा कार्यकारिणीचीही घोषणा करण्यात आली. त्यामध्ये जिल्हा कार्याध्यक्ष अनिल गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष संदीप कापडे, सचिव शरद महापूरे, उपसचिव दिपक कांबळे, जनसंपर्क अधिकारी संतोष वाघ यांचा समावेश आहे.

प्रदेशाध्यक्ष रविराज साबळे म्हणाले की, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघ ही समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांच्या न्यायासाठी कार्य करणारी संघटना आहे. आपल्या हक्कांसाठी जागरूकता निर्माण करणे व अन्यायाविरोधात लढा उभारणे या ध्येयधोरणाने कार्य सुरु आहे.

पंकज लोखंडे यांचे सामाजिक चळवळींमध्ये असलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मानवाधिकार संघाच्या माध्यमातून ते वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंकज लोखंडे म्हणाले की, जिल्हाध्यक्षपदी निवड करून जो विश्वास माझ्यावर टाकण्यात आला आहे. त्या विश्वासाने अन्यायग्रस्त, पीडित व वंचित जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी कार्य केले जाणार आहे. मानवाधिकारांचे उल्लंघन होऊ नये यासाठी प्रशासन, पोलिस व न्यायव्यवस्थेसोबतही समन्वय साधत संघटना सक्रिय राहणार असल्याचे ते म्हणाले.

या बैठकीसाठी विजय जाधव, महिला सेलच्या ज्योती वाघ, सविता हराळ आदी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वैंदेही आठल्ये यांचे बहारदार गायन



नगर – श्री संत किसनगिरीबाबा दत्त मंदिर भिस्तबाग आणि संपूर्ण स्वरानंद संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या एकादशी संगीत सभेत सौ.वैदेही आठल्ये यांच्या गायनाने अकरावे पुष्प झाले. या सभेत तुज मागतो मी आता, मोगरा फुलला, माय भवानी तुझे लेकरू, माझी रेणुका माऊली, शंभो शंकरा, ब्रम्हा विष्णू आणि महेश्वर, अरे अरे ज्ञाना झालासी पावन अशा अनेक अवीट गोडीच्या गाण्यांचे त्यांनी सादरीकरण केले. सुरेलता व भावपूर्ण गायकीला रसिकांची चांगली दाद मिळाली. या कार्यक्रमात हार्मोनियम साठी सौ. उज्वला जोशी, तबला संदेश बेलदार तर तालवाद्य गहिनीनाथ पुंड यांनी साथ संगत केली.

गुरू महाराजांच्या चरणी सेवा करण्याची अनेक दिवसा पासूनची सुप्त ईच्छा आज या सभेच्या माध्यमातून पूर्ण झाली अशा भावना सौ. वैदेही यांनी व्यक्त केली.

किसनगिरीबाबा भक्त मंडळा तर्फे दर एकादशीला संगीत सभेचे आयोजन करण्यात येते या सभेत आज पर्यंत महेश खोपटीकर, केशव सरवदे, सुवर्णा मलमकर, आदेश चव्हाण, योगेश अनारसे, धनश्री खरवंडीकर, संपदा चौधरी, प्रशांत थोरात, ज्ञानेश्वर शिंदे, सोहम लासूरकर, श्रेया सुवर्णपाठकी, अनुजा कुलकर्णी, प्रसाद सुवर्णपाठकी, वैदेही आठल्ये अशा अनेक कलाकारांनी सेवा सादर केलेली आहे.

## महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार विद्या भडके यांना प्रदान



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भडके यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षिका पुरस्काराने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव (ता. शेवगाव) येथील शिक्षिका विद्या रामभाऊ भडके यांना मुंबईत गौरविण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भडके यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राज्याचे विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, प्रधान शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, शिक्षण संचालक महेश पालकर, राज्याचे पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक कृष्णकुमार पाटील आदी उपस्थित होते.

लेखिका तथा कवियत्री असलेल्या विद्या भडके या नागरदेवळे (ता. नगर) येथील रहिवाशी असून, श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. साहित्य क्षेत्रात सातत्याने करीत असलेले उत्कृष्ट लिखाण आणि त्याचबरोबर कवितासंग्रह, कथालेखन यांच्या माध्यमातून सामाजिक समस्येवर प्रकाश टाकण्याचे काम त्या करत आहे. विद्यादान करीत असताना अनेक विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम त्यांनी केले आहे. विविध क्षेत्रात त्यांचे माजी विद्यार्थी कार्यरत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बहुसंख्य विद्यार्थी शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात जिल्हा, विभागीय तसेच राज्य पातळीवर यशस्वी झाले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना पुरस्काराने सन्मानित केले आहे.







सुनील भोसले यांना शिवबंधन बांधताना शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे. शेजारील छायाचित्रात शहर प्रमुख किरण काळे यांच्यासह सुनील भोसले, रावजी नांगरे, विलास उबाळे, योगेश भोरे, अभय प्रभळकर, विकी प्रभळकर, दशरथ उगडे, दीपक उगडे आदी.

## सुनिल भोसले यांचे गरिबांसाठीचे कार्य कौतुकास्पद

**पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवबंधन बांधून केले कौतुक**

नगर – सुनील भोसले हे गोकुळवाडी येथील शिवराजे मित्र मंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य गरिब जनतेसाठी कार्य करीत असून ते माजी आमदार उपनेते दिवंगत अनिल राठोड यांच्या विचाराचे पाईक आहेत. गरिबांच्या प्रश्नाविषयी असलेली त्यांची तळमळ ही कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.

शिवसेना शहर प्रमुख किरण काळे यांनी येत्या महापालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसैनिकांसह 'मातोश्री' येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. याप्रसंगी ठाकरे यांच्या हस्ते सुनील भोसले यांना शिवबंधन बांधण्यात आले.

याप्रसंगी सुनील भोसले म्हणाले, गेल्या २५ वर्षांपासून माजी आ. स्व. अनिल राठोड यांच्या नेतृत्वाखाली शहरात शिवसेनेचा भगवा फडकत होता. मध्यंतरीच्या काळात आम्ही थोडे मागे राहिलो परंतु आता किरण काळे यांच्यासारख्या तडफदार युवा नेतृत्वामुळे ही मरगळ झटकून सामान्य शिवसैनिक पुन्हा एकत्र आले आहेत, आज आमच्यासारख्या सामान्य शिवसैनिकांना मातोश्रीवर नेवून उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधणे हा अभिमानाचा क्षण आहे, असे सांगून शिवराजे मित्र मंडळ व गोकुळवाडी येथील नागरिकांच्या वतीने शहर प्रमुख किरण काळे यांचे आभार मानले. याप्रसंगी शहरप्रमुख किरण काळे, रावजी नांगरे, विलास उबाळे, योगेश भोरे, अभय प्रभळकर, विकी प्रभळकर, दशरथ उगडे, दीपक उगडे आदी उपस्थित होते.

## नशा मुक्ती अभियानामुळे तरुणांमध्ये जनजागृती

**महेंद्र गंधे यांचे प्रतिपादन, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे सेवा पंधरवड्यात अभियान**



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने आयोजित नशा मुक्ती अभियानाचे उद्घाटन करताना भाजपचे नगर विधानसभा प्रमुख महेंद्र गंधे. समवेत बी.के.राजेश्वरी दीदी, सुप्रिया जाधव आदी.

नगर – सुरु असलेल्या सेवा पंधरवडात अहिल्यानगरच्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने नशा मूक्ती अभियान राबवण्यात आले. यामध्ये निर्व्यसनीची शपथ, युवा पिढीला उपदेशात्मक व प्रबोधनात्मक उपाययोजनांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीचे विधानसभा प्रमुख महेंद्र गंधे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी बी.के.राजेश्वरी दीदी, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव यांच्यासह बी.के निर्मला दीदी, बी.के.सुवर्णा दीदी, बी.के.प्रभा दीदी, व्यंकटेश बोमादंडी, सुमित बटुळे, हुजेफा शेख, बी.के.साईनाथ, बी.के.दीपक, बी.के.नरेश, बी.के.संजय गोसावी व अनुयायी उपस्थित होते.

यावेळी महेंद्र गंधे म्हणाले, नाशमुक्तीची चळवळ सुरु केली आहे. हा उपक्रम अत्यंत महत्वाचा असून सध्या तरुण पिढी व्यसनाकडे आकर्षित होत आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी परिवाराच्या उपक्रमामुळे तरुणांमध्ये जनजागृती होईल.



संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली आणि समितीचे सचिव जिल्हा परिषदेचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) दादासाहेब गुंजाळ, जिल्हा समितीचे नवनाथ चव्हाण, लक्ष्मण राठोड, विष्णुपंत पवार यांच्या उपस्थित झाली.

## बंजारा लमाण तांडा घोषित करून महसूली दर्जा देवून पात्र तांड्याच्या ग्रामपंचायत स्थापनेसाठीची कार्यवाही तातडीने करा

नगर – बंजारा लमाण तांडा घोषित करून त्यांना महसूली दर्जा देणे आणि पात्र तांड्याची ग्रामपंचायत स्थापन करण्याची कार्यवाही तातडीने करावी अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिली आहे, अशी माहिती समितीचे सदस्य विष्णुपंत पवार यांनी दिली.

संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली आणि समितीचे सचिव जिल्हा परिषदेचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) दादासाहेब गुंजाळ, जिल्हा समितीचे नवनाथ चव्हाण, लक्ष्मण राठोड, विष्णुपंत पवार यांच्या उपस्थित झाली. त्या प्रसंगी या सूचना देण्यात आल्या.

ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन तांडे घोषित करण्याचा प्रस्ताव गटविकास अधिकारी कडे पाठवल्या नंतर त्या प्रस्तावाची तपासणी करून पात्र प्रस्ताव तांडा समितीकडे पाठवणे. ज्या तांड्याची लोकसंख्या ३५० आहे त्या तांड्याना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४ (१) अनुसार महसूल गाव घोषित करण्यात येईल. ज्या तांड्याची लोकसंख्या ७०० पेक्षा कमी आहे अशा ठिकाणी एकापेक्षा जास्त तांडे एकत्रित करून गट ग्रामपंचायत स्थापन करण्याची कार्यवाही तातडीने करण्याचा सूचना तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती समिती सदस्य पवार यांनी दिली.

### साईबन कृषी पर्यटन क्षेत्रातील

## 'रोटरी पीस हिल'च्या शुभारंभाने शांतता सप्ताहाची सांगता




साईबन कृषी पर्यटन क्षेत्रातील 'रोटरी पीस हील'चा लोकार्पण सोहळा प्रांत ३१३२ चे प्रांतपाल रो सुधीर लातुरे यांच्या हस्ते झाला.

नगर – येथील साईबन कृषी पर्यटन क्षेत्रातील 'रोटरी पीस हील'चा लोकार्पण सोहळा प्रांत ३१३२ चे प्रांतपाल रो सुधीर लातुरे यांच्या हस्ते झाला. सदर प्रसंगी प्रांत ३१३२ शांतता समितीच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया, साईबनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, रोटरीचे अध्यक्ष सुभाष गर्जे, सचिव संदीप ठोंबे, डायरेक्टर निलेश वैकर, पुरूषोत्तम जाधव उपस्थित होते. सदर प्रसंगी प्रांतपाल सुधीर लातूरे यांच्या हस्ते 'आता हृदयरोगाला करूया टाटा बाय बाय' या वैज्ञानिक प्रदर्शनी दालनाचे ही उद्घाटन झाले. 'हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी' हे पुस्तक देऊन उपस्थितांचा सन्मान करण्यात आला.

प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी निसर्गाच्या कुशीत साईबन कृषी पर्यटन क्षेत्रातील रोटरी पीस सेंटरची पहाणी केली. तेथील शांतता निर्माण करणाऱ्या विविध बाबींचा अनुभव घेत त्याचे कौतुक केले. ध्यान मंदिरामध्ये जाऊन ध्यानातून मन:शांतीची अनुभुती घेतली. त्यानंतर रोटरी पीस हील– अर्थात रोटरी शांततेची पहाडी याचे फित कापून उद्घाटन केले. उंचावर असलेल्या या पहाडीच्या टप्प्यावर बसून मेडिटेशन केले.

शांतता पहाडीचे वैशिष्ट्ये सांगताना डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या कि या पहाडीवरून सकाळी सूर्योदयचा आस्वाद घेता येतो व याच पहाडीवरून संध्याकाळी सूर्यास्ताचाही देखावा दिसतो. यामुळे सनराईज मेडिटेशन व सनसेट मेडिटेशन या दोन्ही बाबींचा आनंद या पहाडीवरून घेता येतो. महाराष्ट्रातील ही पहिली शांततेची पहाडी आहे. पर्यटकांना ती नक्कीच शांतीची अनुभुती देते. येथे वाहणारी प्रसन्न हवा, डोळ्यांना सुखदायी वाटणारी हिरवळ, फुललेली रंगीबेरंगी फुले, व ऐकू येणारी मंजूळ आध्यात्मिक गाणी आपल्या मनाला परम् शांतीचा अनुभव देतात.

याप्रसंगी उद्घाटन पर मार्गदर्शन करतांना प्रांतपाल लातुरे म्हणाले की, सध्याचे जग दु:ख, टेन्शन व आजारपणाने ग्रासून गेले आहे. मनाला कुठेही शांतता लाभत नाही. शांतता कुठेही दुकानात किंवा मॉलमध्ये विकत मिळत नाही ती आपल्या मनामध्येच असते. मेडिटेशन व्दारे त्याचा आपण अनुभव घेऊ शकतो. रोटरी पीस हील अर्थात रोटरी शांतता पहाडी व्दारे हजारो पर्यटकांना नक्कीच शांतीची अनुभुती प्राप्त होईल. आता घराघरातून जनमाणसात शांतीचा संस्कार रूजला पाहिजे. शांती कुठे बाहेर न शोधता एका जागी शांत बसून ती स्वत:मध्येच गवसणार आहे. यासाठी या शांतता पहाडीची निर्मिती झाली आहे. तसेच हृदयाविषयीच्या दालनाचे उद्घाटन करतांना हार्टअटॅक सारख्या जिवघेण्या समस्यांचे निवारण करून सामाजिक शांती प्रस्थापित करणारा हा प्रकल्प आहे यालाच पीस थ्रु सर्विस असे म्हणता येईल. असे ते म्हणाले.

सुरूवातीस रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश कांकरिया यांनी कृषी पर्यटनाची माहिती दिली. डॉ. सुधा कांकरिया यांनी रोटरी पीस सेंटर मधील विविध बाबी पीस पार्क, सेल्फी पॉईंट, पीस हील, ईको फ्रेंडली ध्यान मंदिर, पीस थ्रु हेल्दी हार्ट प्रोजेक्ट, राजयोगा मेडिटेशन ॲन्ड काऊंसेलिंग सेंटर, नक्षत्र उदयान, बटरफ्लाय गार्डन बद्दल माहिती सांगितली. रोटरी पीस पोल देऊन सन्मान करण्यात आला. सचिव संदीप ठोंबे यांनी आभार मानले.

# उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या पुणे परीवर्तन चातुर्मासासाठी अहिल्यानगर सकल संघ व चातुर्मास समितीतर्फे २८ सप्टेंबरला दर्शन यात्रा


आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांचे शिष्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा. आदी ठाणा २ यांचा परिवर्तन चातुर्मास दर्शनाचा धर्मलाभ घेण्यासाठी आनंदधाम येथील धार्मिक परीक्षा बोर्डात सकल संघ तर्फे बैठकीत अशोक (बाबूशेठ) बोरा आदी.

नगर – आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांचे शिष्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा. आदी ठाणा २ यांचा परिवर्तन चातुर्मास सध्या पुण्यातील वर्धमान प्रतिष्ठान, गंगाधाम येथे तपश्चर्यापूर्ण व उत्सवपूर्ण वातावरणात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात जाऊन दर्शनाचा धर्मलाभ घेण्यासाठी आनंदधाम, धार्मिक परीक्षा बोर्डात अहिल्यानगर सकल संघातर्फे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीचे आयोजन चातुर्मास समिती २०२६ ने केले होते. यामध्ये अशोक (बाबूशेठ) बोरा, आदेश चंगेडिया, राजेश भंडारी, मनसुखलाल गुंदेचा, अनिल पोखर्णा, संतोष शेटिया, राजकुमार बोरा, रतिलालजी कटारिया, ॲड. अमृत मुथा, सुमतीलाल कोठारी, अरविंद गुंदेचा, संतोष बोरा, देवेंद्र गांधी, मदनलाल देसरडा, संजय बोरा, अशोक बलदोटा, अजित गुगळे, प्रमोद गांधी, सचिन डागा, सतीश गुंदेचा, संजय बोरा तसेच महिला वर्गातून सपना कटारिया, योगिता चंगेडिया, उल्का सोलंकी उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या विविध सकल संघांचे संघपती व प्रतिनिधी विशेष करून उपस्थित होते. यामध्ये अनिल कटारिया (महावीरनगर), अभय कोठारी (आगरकर मळा), कांतिलाल गांधी (सारसनगर), संदीप गांधी (सावेडी) यांच्यासह केडगाव, नागापूर, विनायकनगर, महावीर चषक ग्रुपतर्फे संजय चोपडा, जय आनंद फाउंडेशन तर्फे कमलेश भंडारी, वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानतर्फे ईश्वर बोरा, प्रतीक बोगावत आदींचा समावेश होता.

बैठकीत सर्वांनी विचार व्यक्त करताना उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांचा २०२६ सालचा चातुर्मास अहिल्यानगर आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा. यांच्या नेश्रायात ऐतिहासिक व ना भूतो ना भविष्यति ठरावा, असा निर्धार व्यक्त केला. यासाठी तन–मन–धनाने सहकार्य करण्याचा संकल्पही सर्वांनी केला. यासोबतच प्रत्येक सकल संघाकडून किमान एक बस पुणे दर्शन यात्रेसाठी २८ सप्टेंबर रोजी पाठवण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. पुणे दर्शन यात्रेसाठी प्रत्येक भाविकांकडून केवळ २०० रुपये नाममात्र सहकार्य शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

बैठकीचा समारोप श्री आलोकऋषिजी म.सा. यांच्या मंगलिकने झाला. त्यांनी आगामी चातुर्मास आयोजनासाठी मंगलाशिर्वाद दिले. २०२६ चा आनंदधामातील चातुर्मास हा २००९ च्या तुलनेत अधिक भव्य, अद्वितीय व ऐतिहासिक ठरणार असून त्याची गाज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतभर होईल, असा विश्वास आयोजक समितीने व्यक्त केला.

पुणे दर्शन यात्रेसाठी नावे नोंदविण्याकरिता संपर्क व्यक्ती : सावेडी : राजकुमार बोरा ९४२२२२६३९३, संदीप गांधी ८८०५५६६५५६, महावीरनगर : अनिल कटारिया ९८२२२९६९६५, अशोक बलदोटा ९८२२०४०५१६, आगरकर मळा : अभय कोठारी ९४२०६२००००., सारसनगर : कांतिलाल गांधी ९४२३७९२६४५, एस.के. ज्वेलर्स (एम.जी. रोड) : ईश्वर बोरा ९८२३७९९९९८, आदेश चंगेडिया ९०१११ ५५५५५., महावीर चषक परिवार : संजय चोपडा ९८२२०२५७५७., अर्हम विज्ञा परिवार : सपना विलास कटारिया ८२०८७१८४८९, योगिता चंगेडिया ९९२१६२९५५०, उल्का सोलंकी ८७८८७९३०८३, अपेक्षा संकलेचा ९२२५३१४५०९.



तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यश मिळविणारे ब्ल्यू डायमंड ॲकॅडमीतील विद्यार्थी.

# तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ब्ल्यू डायमंड ॲकॅडमीची बाजी

नगर – अहिल्यानगरमध्ये आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ब्ल्यू डायमंड ॲकॅडमीतील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

या स्पर्धेत १६ शाळांनी सहभाग घेतला होता. पाचवी ते सातवी लहान गट व आठवी ते दहावी मोठा गट अशा दोन गटांमधून स्कूलमधील ४ विद्यार्थी सहभागी झाले होते. दोन्ही गटातील प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक ब्ल्यू डायमंड स्कूलने पटकावला आहे.

सहभागी विद्यार्थी मोठा गट – आफशा इमरान खान (१० वी, प्रथम क्रमांक) व बुशरा शाहिद शेख (८ वी, द्वितीय क्रमांक). लहान गट – ओवी कन्हैया परदेसी (६ वी, प्रथम क्रमांक) व सुदिक्षा संतोष बहिरट (५ वी, द्वितीय क्रमांक) या सहभागी झालेल्या चारही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्याबद्दल त्यांचे स्कूलचे प्राचार्य, उपप्राचार्या व पालकांनी कौतुक केले आहे.

# राज्यस्तरीय प्रजासत्ताकदिन संचलन निवड चाचणी शिबिरासाठी न्यू आर्टस महाविद्यालयातील स्वयंसेवकाची निवड

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राज्यस्तरीय / राष्ट्रीय प्रजासत्ताकदिन पूर्वसंचलन विद्यापीठस्तरीय निवडचाचणी शिबिराचे आयोजन १९ सप्टेंबर रोजी पुणे विद्यापीठामध्ये करण्यात आले होते. या विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबिरामधून न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वायत्त) राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक राहुल पावसे याची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

निवड झालेल्या स्वयंसेवकांना २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या ठिकाणी आयोजित राज्यस्तरीय/राष्ट्रीय प्रजासत्ताकदिन संचलन राज्यस्तरीय निवडचाचणी शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. त्यात राहुल पावसे या स्वयंसेवकांचा समावेश आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. भास्करराव झावरे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, प्रबंधक बबन साबळे या सर्वांनी अभिनंदन केले. या स्वयंसेवकाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश निमसे, प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, प्रा. डॉ. नयना कडाळे, प्रा. भगवान कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.



मराठी ख्रिस्ती साहित्य परिषद आणि उपदेशक यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर ख्रिस्ती साहित्य संघाची स्थापने प्रसंगी अध्यक्ष पौलस वाघमारे आदी.

# अहिल्यानगर येथे ख्रिस्ती साहित्य संघाची स्थापना

नगर – मराठी ख्रिस्ती साहित्य परिषद आणि उपदेशक यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर ख्रिस्ती साहित्य संघाची स्थापना करण्यात आली. अहिल्यानगर येथे ख्रिस्ती साहित्य चळवळ वाढीस लागावी या हेतूने हा साहित्य संघ काम करेल असे मराठी ख्रिस्ती साहित्य परिषदेचे अध्यक्ष पौलस वाघमारे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले.

यावेळी उपदेशकचे संस्थापक विक्रम गायकवाड, मराठी मिशनच्या अध्यक्षा विजया जाधव, कवयित्री सरोज आल्हाट, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. सुजाता लोंढे, ख्रिस्ती साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष आशिष शिंदे, ॲड. विनायक पंडित, रेव्ह. ॲड. देवदत्त कसोटे, नरेश चव्हाण यांच्या सह साहित्यिक उपस्थित होते. लवकरच अहिल्यानगर साहित्य संघाच्या वतीने कविसंमेलन आयोजित करण्यात येईल अशी घोषणा उपदेशकचे संस्थापक विक्रम गायकवाड यांनी केली.

# रवींद्र मुळे यांच्या 'परीसवेध' पुस्तकाच्या तृतीय आवृत्तीचे २६ सप्टेंबरला प्रकाशन




नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते व अभियंता रवींद्र तथा राजाभाऊ मुळे यांनी लिहिलेल्या 'परीसवेध' या पुस्तकाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन २६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५:३० वाजता सहकार सभागृहात होणार आहे. शताब्दी साजऱ्या करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नगर जिल्ह्यात प्रतिकूल काळात आत्म विलोपी व अनामिक ज्या कार्यकर्त्यांनी संघाचे काम पुढे नेले आशा स्वयंसेवकांच्या कार्याला उजाळा 'परिसवेध' या पुस्तकात देण्यात आला आहे, अशी माहिती विचार भारतीचे अध्यक्ष अरुणराव कुलकर्णी यांनी दिली.

देवगड संस्थानचे महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते प्रकाशन होणार असून यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क प्रमुख रामलाल प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी रा.स्व.संघाचे प्रांत संघचालक महाराष्ट्र नाना जाधव, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे उपस्थितीत राहणार आहेत. विचार भारती आणि भारतीय विचार साधना यांच्या वतीने करण्यात येत आहे, असे विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी सांगितले.

राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या या पुस्तकाच्या आवृत्तीला सर संघचालक मोहन भागवत यांची प्रस्तावना लाभली आहे. या पुस्तकाच्या पहिल्या दोन आवृत्तींच्या ३००० प्रति आत्ता पर्यंत संपल्या आहेत, अशी माहिती विचार भारतीचे सहसचिव महेंद्र जाखेटे यांनी दिली.

पुस्तक प्रकाशन सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन विचार भारतीच्या वातीये करण्यात आले आहे.

# नगर कॉलेजतर्फे 'ऑन रिसेंट डिस्कव्हरीज अ‍ॅण्ड इनोव्हेशन्स इन लाइफ सायन्सेस' आंतरराष्ट्रीय परिषदेत भारतासह परदेशातून ४५० हून अधिक प्रतिनिधींचा सहभाग


नगर कॉलेजतर्फे ऑन रिसेंट डिस्कव्हरीज ॲण्ड इनोव्हेशन्स इन लाइफ सायन्सेस या आंतरराष्ट्रीय परिषदेत संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस आदी.

नगर – भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या (बीपीएचईएस) अहमदनगर कॉलेजतर्फे आंतरराष्ट्रीय परिषद ऑन रिसेंट डिस्कव्हरीज ॲण्ड इनोव्हेशन्स इन लाइफ सायन्सेस (आयसीआरडीआयएलएस–२०२५) ही आंतरराष्ट्रीय परिषद १८, १९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या हायब्रिड पद्धतीतील (प्रत्यक्ष आणि ऑनलाईन) परिषदेतील भारतासह परदेशातून ४५० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले.

परिषदेचे उद्घाटन वैज्ञानिक डॉ. भूषण पाटवर्धन यांच्या हस्ते झाले. त्यांनी डॉ. विजय खन्ना मेमोरियल व्याख्यान देताना औषध शोध व औषधनिर्माण संशोधनातील नव्या प्रवाहांवर विचार मांडले. आपल्या प्रमुख व्याख्यानात त्यांनी अहमदनगर कॉलेजमधील विद्यार्थी दिवसांच्या आठवणी जागवल्या आणि पुन्हा या कॅम्पसमध्ये येणे म्हणजे घरी परतल्यासारखे असल्याचे सांगितले. त्यांनी कॉलेजचा परंपरागत वारसा, दूरदृष्टी असलेले प्राध्यापक आणि आंतरशाखीय शिक्षणसंस्कृती यावर विशेष भर दिला. डॉक्टर पाटवर्धन यांनी तरुण संशोधकांना नवोन्मेषना नैतिकतेसह पुढे नेण्याचे आवाहन केले तसेच आधुनिक आण्विक विज्ञानास आयुर्वेदासारख्या पारंपरिक ज्ञानपद्धतींशी जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

आयसीआरडीआयएलएस २०२५ मध्ये ३० हून अधिक आमंत्रितांची व्याख्याने झाली. यात डॉ. जयप्रकाश मुळीयिल (सीएमसी, वेल्लोर), डॉ. मनोहर आर. फुर्टाडो (अमेरिका), प्राध्यापक अरविंद ए. नाटू (आयआयएसईआर, पुणे), डॉ. सी.के. जॉन (एनसीएल, पुणे), डॉ. शर्मिला बापट (संचालक, एनसीसीएस, पुणे), डॉ. सुरेंद्र घासकडबी (मॅक्स–एआरआय, पुणे), डॉ. राहुल भांबुरे (एनसीएल, पुणे), डॉक्टर सौरव मजुमदार (अ‍ॅजाइल बायोसायन्सेस प्रा. लि., अहमदाबाद, गुजरात), डॉक्टर एस.टी. लोंकार (एन्वोकेअर रिसर्च अँड इंजिनियरिंग प्रा. लि., पुणे), डॉक्टर शुभांगी मुंगरे (नॉर्थईस्टर्न इलिनॉयिस विद्यापीठ, शिकागो, अमेरिका), डॉ. चित्रा एफ. मनोहर (रोश, अमेरिका), प्राध्यापक पोरुनेलूर मॅथ्यू (नॉर्थ टेक्सास विद्यापीठ, अमेरिका), डॉ. सुजीत नीरक्कल (बायोअ‍ॅटलांटिस लि., आयर्लंड), डॉ. शंकर स्वामिनाथन (बॉश, अमेरिका), डॉक्टर जे.आर. कुमार व डॉ. शिवराजू (जेएसएस एएचईआर, मैसूर, कर्नाटक) यांचा समावेश होता. विविध सत्रांमध्ये रसायनशास्त्र, जीव रसायनशास्त्र, आण्विक जीवशास्त्र, जैविक तंत्रज्ञान, शेती, पर्यावरण विज्ञान, न्यूट्रास्युटिकल्स व बायोमेडिकल इनोव्हेशन्स यांसारख्या विषयांचा समावेश होता.

तरुण संशोधकांना संधी मिळावी यासाठी त्यांच्या संशोधन क्षेत्रातील नवीन शोधासाठी प्रत्यक्ष सादरीकरण व ई–पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. निवडलेल्या संशोधकांना त्यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकेत प्रकाशित करण्यासाठी संधी प्राप्त झाली आहे.

या परिषदेच्या यशामागे डॉक्टर भास्कर पांडुरंग हिवाळे शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस (अध्यक्ष, बीपीएचईएस) व संस्थेचे सचिव विशाल बार्नबस यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व महत्त्वाचे ठरले.

कन्व्हीनर डॉ. नोएल पार्जे (कार्यवाह प्राचार्य) व आयोजक सचिव डॉ. इवान अरान्हा यांनी आयोजनाची सूत्रे सांभाळली. १९४७ साली स्थापन झालेले अहमदनगर कॉलेज महाराष्ट्रातील शैक्षणिक उत्कृष्टता व सामाजिक परिवर्तनाचे दीपस्तंभ ठरले असून जागतिक शैक्षणिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देत आहे.

सांस्कृतिक व पुरस्कार समारंभात उत्कृष्ट संशोधन सादरीकरणांचा गौरव करण्यात आला तसेच वैज्ञानिक, शिक्षक व विद्यार्थ्यांमधील स्नेहबंध दृढ झाले. शेवटी निरोप सत्रात आरोग्य, शेती व पर्यावरण क्षेत्रातील जागतिक आव्हानांवर शाश्वत वैज्ञानिक उपायांची गरज अधोरेखित करण्यात आली.

या परिषदेची संकल्पना व प्रेरणा डॉ. मनोहर आर. फुर्टाडो (अमेरिका) व त्यांच्या सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इंडिया असोसिएशन ट्रस्ट कडून मिळाली. आयोजक सचिव डॉ. इवान अरान्हा यांनी आपल्या कार्यसंघासह ही परिषद यशस्वी केली. तसेच डॉ. जॉन बार्नबस पीजी स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांनी या परिषदेला पाठिंबा दिला.

# धनादेश न वटल्याच्या फौजदारी खटल्यात दंडाची व कैदेची शिक्षा

नगर – पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी कर्जदाराने दिलेला धनादेश न वटल्याच्या फौजदारी खटल्यात आरोपी रवि नरेश नारोज (रा. अष्टविनायक अपार्टमेंट, तोफखाना, अ.नगर) यांच्यावर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वयेचा आरोप सिध्द झाल्यामुळे अ.नगर येथील १५ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी कर्जदारास दोषी धरुन सहा महिन्यांची कैद व रक्कम रुपये १,२०,००० दंडाची शिक्षा सुनावली व सदरची रक्कम फिर्यादी पतसंस्थेस देण्याचा आदेश केला.

अ.नगर सातभाई मळा येथील मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्थेकडून आरोपी कर्जदार रवि नरेश नारोज यांनी सन २०१५ मध्ये व्यवसाय वाढीसाठी रक्कम रुपये सत्तर हजारांचे कर्ज घेतलेले होते. सदरचे कर्ज थकीत झाल्यानंतर त्या रकमेच्या परतफेडीपोटी वरील आरोपी / कर्जदाराने सदर पतसंस्थेस थकबाकीची रक्कम म्हणून रक्कम रुपये १,००,००० चा २३/१२/२०१९ रोजीचा धनादेश दिलेला होता.

सदरचा धनादेश मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्थेने त्यांचे खाते असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या अ.नगर येथील शाखेत जमा केला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे तो न वटता परत आला, त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने आरोपी कर्जदाराविरुध्द नोटीस पाठवून रक्कम न भरल्यामुळे अ.नगर येथील न्यायालयात वरील कायद्यानुसार फौजदारी खटला दाखल केलेला होता.

या खटल्यात आरोपी न्यायालयात हजर रहात नसल्यामुळे त्याच्या विरुध्द नॉन बेलेबल वॉरंट काढलेले होते परंतु सदर आरोपी हा त्या वॉरंटची बजावणी होऊ देत नव्हता त्यामुळे फिर्यादीचे वकीलांनी न्यायालयास लेखी विनंती केली असता मुंबई उच्च न्यायालयाच्या नविन न्याय निर्णयानुसार सदरचा निकाल आरोपीच्या गैरहजेरीत सुनावण्यात आला व आरोपी रवि नरेश नारोज यांचे विरुध्द त्याचवेळी शिक्षेच्या अंमलबजावणीचे वॉरंट जारी करण्यात आले. या फौजदारी खटल्यात फिर्यादी म्हणून सुभाष विश्वनाथ कोडम उपस्थित होते व फिर्यादी पतसंस्थेतर्फे ॲड. रमेश अ. जोशी, ॲड. सौ. दीपाली झांबरे यांनी काम पाहीले, त्यांना ॲड.राजस करमरकर यांनी सहाय्य केले.

# 'भाजपा वकील'तर्फे २७ सप्टेंबरला 'कायद्याविषयक मोफत सल्ला शिबीर'

नगर – भाजपा वकील आघाडीमार्फत २७ सप्टेंबर रोजी सर्वसामान्य लोकांसाठी मोफत कायद्याविषयक सल्ला शिबीराचे आयोजन केलेले आहे. सदरचा कार्यक्रम हा ॲडव्होकेट चेंबर्स क्र. ३१८, जुने जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे शहर अध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते सकाळी ११ वा. करण्यात येणार आहे. सदरचे कायदेविषयक शिबीर हे सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत चालू राहील, अशी माहिती वकील आघाडीचे अध्यक्ष ॲड. चंदन बारटक्के (मो.नं.७०२०३५९९४३) यांनी दिलेले आहे. याकरीता वकील सेलचे पदाधिकारी ॲड.संदिप काळे, ॲड. सौरभ राऊत, ॲड. राहुल रासकर, ॲड. कैलास कोतकर, ॲड. रावसाहेब चौधरी, ॲड. योगेश मांडोत, ॲड.वर्धमान भंडारी, ॲड. रविंद्र लगड, ॲड. व्यंकटेश शिरसुल, ॲड. सचिन घावटे, ॲड. निखिल मुसळे, ॲड. रुपेश भांबरे, ॲड. हरेश कल्याणी, ॲड.किरण वनारसे, ॲड. विजय महाजन, ॲड. देवेंद्र बंब, ॲड. संतोष भोसे, ॲड. अविनाश साकला, ॲड. अशिष पोटे आदी उपस्थित राहुन कायद्याविषयक मोफत सल्ला देणार आहेत.



## रामकरण सारडा विद्यार्थी गृहाला डायनिंग टेबल भेट

हिंद सेवा मंडळाच्या रामकरण सारडा विद्यार्थी गृहातील विद्यार्थ्यांसाठी उद्योजक किरण मोहनलाल राका व जगन्नाथ एकनाथ बजाज यांच्यावतीने डायनिंग टेबल भेट देण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे कार्यकारणी सदस्य मधुसूदन सारडा, चेअरमन श्यामसुंदर सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, ब्रिजमोहन बक्षी, बजरंग दरक, राजेश बजाज, परेश बजाज, यश बजाज, वसतिगृह अधिक्षक बंडू भोसले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बजरंग दरक यांनी केले. अजित बोरा यांनी आभार मानले.

# निमगाव वाघा येथे २८ सप्टेंबर रोजी नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन

## पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे यांच्या हस्ते होणार कर्तृत्ववान महिलांचा गौरव



नगर – स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व नगर तालुका तालिम सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे नवरात्र उत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त २८ सप्टेंबर रोजी नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव भरोसा सेलच्या प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे यांच्या हस्ते होणार आहे.

निमगाव वाघा (ता. नगर) येथील परिवार मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता महिलांचा सन्मान सोहळा होणार आहे. यावेळी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, समाजातील विविध क्षेत्रातील महिला सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमात सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग, पर्यावरण आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा गौरव करण्यात येणार आहे. महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे कार्यक्रमाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी म्हटले आहे.

# कॅलिडोस्कोप



## आईच आकारते मुलीकडून घरभाडे!

अमेरिकेतील अटलांटा येथे एक अनोखा प्रकार उघडकीस आला. येथे एक महिला तिच्या जुळ्या मुलींकडून घरात राहण्यासाठी भाडे आकारते. इतकेच नाही, तर भाडे वेळेवर न दिल्यास ती मुलींना दंडदेखील करते. ती महिला म्हणते, की ती हे सर्व त्यांच्या कल्याणासाठी करत आहे.

जॉर्जियातील ३८ वर्षीय टोया व्हिटफिल्ड आपल्या ग्रेस आणि ऑटम या नऊ वर्षांच्या जुळ्या मुलींकडून घरात राहण्यासाठी भाडे आकारते. या अनोख्या पद्धतीमागील उद्देश तिच्या मुलींना पैशाचे आणि आर्थिक जबाबदारीचे महत्त्व शिकवणे आहे. टोयाच्या मुलींनी एकदा तिच्याकडे महागड्या रेस्टॉरंटमध्ये जाण्याचा आग्रह धरला. टोयाला जेव्हा आपल्याकडे इतके पैसे नाहीत, असे सांगितले, तेव्हा मुली लगेच म्हणाल्या, तुला तर तुझा पगार मिळाला आहे... हे ऐकून टोयाला समजले, की मुलींना पैशाचे महत्त्व अजिबात समजत नाही. त्यानंतरच तिने ठरवले, की ती आपल्या मुलींना जीवनाचा धडा शिकवेल. यानंतर, टोयाने आपल्या मुलींसाठी एक बनावट भाडे करार आणि पैसे खेळा प्रणाली तयार केली, जेणेकरून त्यांना जबाबदारीची जाणीव होईल. या अंतर्गत, ती दर आठवड्याला आपल्या मुलींना पगार म्हणून काही पैसे देते. त्यातून त्यांना घरभाडे, वीज, वाय-फाय आणि गॅससारखे खर्च द्यावे लागतात. तिने मुलींना असेही सांगितले, की त्यांनी घर घाण केले किंवा वेळेवर भाडे दिले नाही, तर दंड आकारला जाईल. इतकेच नाही तर, त्यांना घराबाहेरही हाकलून दिले जाऊ शकते.

याशिवाय, चांगले गुण मिळवण्यासाठी, चांगले वागण्यासाठी ती मुलींना बोनस देते. या पद्धतीने मुलींना पैशाचे महत्त्व शिकवले जाईल, असा तिचा विश्वास आहे.




## पेट्रोल भरले आणि झाले अब्जाधीश!

देव जेव्हा देतो, तेव्हा छप्पड फाडून देतो. कधी कधी काही माणसांचे नशीब क्षणार्धात पालटते. एका व्यक्तीची अशीच कहाणी समोर आली आहे. ही कहाणी ऐकल्यावर तुमचाही विश्वास बसेल, की माणसाच्या नशिबाचा काही भरवसा नाही, ते कधीही पलटू शकते. अमेरिकेतील दोन कोपऱ्यांमध्ये मिसुरी आणि टेक्सास येथे दोन लॉटरीची तिकिटे विकली गेली होती. या दोन तिकिटांनी ती विकत घेणाऱ्या व्यक्तींचे नशीबच पलटले. अमेरिकेतील दोन व्यक्तींना १.७९ अब्ज डॉलरचा ऐतिहासिक पॉवरबॉल जॅकपॉट मिळाला. गेल्या तीन महिन्यांपासून हा जॅकपॉट कोणालाच मिळाला नव्हता. या धक्कादायक प्रकराने लॉटरीच्या इतिहासात नवीन कहाणी जोडली गेली. इतकच नव्हे, तर दोन सामान्य नागरिकांना काही सेकंदातच अब्जाधीश बनवले.

हा पॉवरबॉलच्या इतिहासातील दुसरा सर्वात मोठा जॅकपॉट होता. याचा अर्थ असा, की दोन्ही विजेते एक तर ८९५ दशलक्ष डॉलरचा वार्षिक हप्ता पर्याय निवडू शकतात किंवा ४१०.३ दशलक्ष डॉलरची रक्कम घेऊ शकतात. फ्रेडरिक्सबर्ग नावाच्या एका छोट्या गावातील व्यक्तीने पेट्रोल पंपावर लॉटरीचे तिकीट खरेदी केले होते. या तिकिटातून तो अब्जाधीश बनला. पॉवरबॉल जॅकपॉट हा २०२५ मधील सर्वात मोठा जॅकपॉट ठरला आहे. त्याने मार्चमध्ये कॅलिफोर्नियामध्ये जिंकलेल्या ५२६.५ दशलक्ष डॉलरच्या जॅकपॉटला मागे टाकले. यापूर्वी २०२३ मध्ये कॅलिफोर्नियातील थिओडोरस स्ट्रक आणि त्यांच्या गटाने १.७६५ अब्ज डॉलर जिंकले होते, तर २०२२ मध्ये एडविन कॅस्ट्रोने आतापर्यंतचा सर्वात मोठा २.०४ अब्ज डॉलरचा पॉवरबॉल जॅकपॉट जिंकला होता. ३१ मे रोजी कॅलिफोर्नियात विकल्या गेलेल्या २०४.५ दशलक्ष डॉलरच्या अनक्लेम्ड तिकिटानंतर पहिल्यांदाच असे ग्रँड प्राइज जिंकले गेले.

हा खरोखरच नशिबाचा खेळ होता. कारण यात जिंकण्याची शक्यता अत्यंत कमी असते. लकी ड्रॉच्या रात्री १५ इतर खेळाडूंनीही एक दशलक्ष डॉलर जिंकले. यापैकी कन्सास आणि टेक्सासच्या दोन खेळाडूंनी पॉवर प्ले चा पर्याय निवडला. त्यामुळे त्यांची रक्कम थेट दोन दशलक्ष डॉलर झाली. या विजेत्यांमध्ये कॅलिफोर्निया, इलिनॉय, न्यूयॉर्क, ओहायो, टेक्सास, फ्लोरिडा, मिशिगन, कोलोराडो, न्यू जर्सी, मॅसाचुसेट्स, वेस्ट व्हर्जिनिया, ओरेगन आणि कन्सास यासारख्या राज्यांतील रहिवाशांचा समावेश आहे.

## अनोखा युरेनस

आपल्या सूर्यमालेतल्या प्रत्येक ग्रहाचं ठळक वैशिष्ट्य आहे. युरेनस नावाचा एक ग्रह आहे. युरेनसवर वायूंचं प्रमाण खूप जास्त आहे. दुर्बिणीतून शोधण्यात आलेला युरेनस हा आपल्या सूर्यमालेतला पहिलाच ग्रह आहे. हा सातव्या क्रमांकाचा सर्वात लांबचा ग्रह आहे. युरेनस स्वत:भोवती फिरतो. तो १७ तासांमध्ये एक फ ेरी पूर्ण करतो. इथलं एक वर्ष पृथ्वीवरच्या ८४ वर्षांइतकं असतं. युरेनस ग्रहावर ४२ वर्ष रात्र आणि ४२ वर्ष दिवस असतो. त्यामुळे या ग्रहाचा एक ध्रुव सतत ४२ वर्षं सूर्यासमोर तर दुसरा ध्रुव अंधारात असतो. युरेनस सूर्यापासून जवळपास तीन अब्ज किलोमीटर दूर आहे. इथलं सरासरी तापमान उणे १९७ अंश असतं. इथलं कमाल तापमान उणे २२४ अंशांपर्यंत जातं. या ग्रहाला २७ उपग्रह आहेत. यापैकी बरेच उपग्रह छोटे आणि असंतुलित आहेत. म्हणूनच हा ग्रह अनेक अर्थांनी वेगळा आहे.



## तेलंगणातील एका माशाला माणसासारखे दात!

तेलंगणातील निर्मल जिल्ह्यातील एका घटनेमुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. गोदावरी नदीच्या फुगवट्याच्या पाण्यात एका मच्छीमाराला एक विचित्र मासा सापडला. त्याचे दात अगदी माणसांसारखे आहेत. हा मासा पाहून मच्छीमारच नाही तर आजूबाजूचे लोकही आश्चर्यचकित झाले. हा अनोखा मासा पाहण्यासाठी दूरदूरून लोक येत आहेत.

ही घटना निर्मल जिल्ह्यातील गोदावरी नदीच्या फुगवट्यातील पाण्यामधील आहे. एक स्थानिक मच्छीमार दररोजप्रमाणे पहाटे मासे पकडण्यासाठी गेला होता. त्याने जाळे टाकले आणि ओढले तेव्हा त्यात एक मासा अडकला. का मासा पाहून तो थक्क झाला. माशाकडे काळजीपूर्वक पाहिल्यावर त्याच्या तोंडात माणसांसारखे दोन ओळीचे दात आहेत, असे आढळले. हे पाहून मच्छीमार थक्क झाला. त्याने ताबडतोब आपल्या साथीदारांना बोलावले आणि



ही बातमी संपूर्ण गावात पसरली. स्थानिक लोक म्हणतात, की त्यांनी संपूर्ण आयुष्यात असा मासा कधीही पाहिला नाही. काही लोक याला चमत्कार मानत आहेत तर काहीजण त्याला निसर्गाचा चमत्कार म्हणत आहेत. शास्त्रज्ञांनी सांगितले, की हा माशांचा एक विशेष प्रकार आहे. त्याला 'पाकू फिश' म्हणतात. हा मासा सहसा दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीत आढळतो. हा पिरान्हा माशांच्या कुटुंबातील आहे; परंतु तो पिरान्हासारखा धोकादायक नाही. पिरान्हा मासा मांसाहारी आहे; परंतु पाकू मासा शाकाहारी आहे. त्यांचे मुख्य अन्न फळे, बिया आणि पाण्यात वाढणारी वनस्पती आहे. पाकू माशांचे दात माणसांसारखे असतात. त्यामुळे ते आणखी वेगळे दिसतात. हे दात इतके मजबूत आहेत, की हा मासा कठीण फळे आणि बिया सहजपणे चावू शकतो. तथापि, हा मासा मानवांना अजिबात हानी पोहोचवत नाही.

हा मासा भारतात कुठून आला?

तज्ज्ञांच्या मते हा मासा व्यापार किंवा इतर मार्गांने भारताच्या जलाशयात आला असावा. अनेक वेळा लोक परदेशी मासे मत्स्यालयात ठेवण्यासाठी आणतात आणि नंतर नद्या किंवा तलावात सोडतात. अशा प्रकारे हा मासा गोदावरी नदीत पोहोचला असावा.



## या देशात बायका मिळतात भाड्याने!

जगात एक असा देश आहे, जो त्याच्या नैसर्गिक सौंदर्यामुळे, समुद्रकिनारे आणि नाईटलाइफमुळे प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहे. या देशाचे नाव आहे थायलंड. त्याचे सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करते. आजकाल हा देश एका अनोख्या आणि वादग्रस्त सामाजिक ट्रेंडमुळे चर्चेत आहे. थायलंडमध्ये बायको भाड्याने घेण्याचा ट्रेंड दिवसागणिक वाढताना दिसत आहे.

थाइलंडमधील गरीब कुटुंबातील महिला हे काम करतात. त्यामुळे त्या आपल्या कुटुंबाची भूक भागवू शकतात. या देशात महिला कायम बार आणि नाईट क्लबमध्ये काम करताना दिसतात. तिथे त्यांची परदेशी पर्यटकांसोबत ओळख होते. 'भाड्याने बायको' या ट्रेंडला 'वाइफ ऑन हायर' किंवा 'ब्लॅक पर्ल' असे म्हणतात. यामध्ये काही महिला पर्यटकांसोबत काही काळासाठी त्यांच्या बायकोप्रमाणे राहतात. महिला पर्यटकांसाठी जेवण बनवतात, त्यांच्यासोबत फिरायला जातात, एका जोडीदाराप्रमाणे पर्ययटकांसोबत राहतात. हे नाते पूर्णपणे करारावर आधारित असते आणि त्याला कायदेशीर विवाहाचा दर्जा मिळत नाही.

एखाद्या पर्यटकाला त्या महिलेबद्दल खोलवर प्रेम वाटत असेल, तर भविष्यात दोघे लग्न करू शकतात. 'भाड्याने घेतलेल्या बायको'ची फी महिलेचं वय, सौंदर्य, शिक्षण आणि कराराचा कालावधी यावर अवलंबून असते. काही महिला काही दिवस राहतात, तर काहीजणी काही महिने राहतात. त्यापोटी द्यावे लागणारे भाडे सुमारे १.३ लाख रुपयांपासून ९६ लाख रुपयांपर्यंत असू शकते. हा पूर्णपणे खासगी करार असतो, कारण थायलंडमध्ये यासाठी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. बदलती जीवनशैली आणि वाढत्या एकाकीपणामुळे थायलंडमध्ये या ट्रेंडला चालना मिळाली असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे थायलंड सरकारनेही हे मान्य केले आहे, की ही प्रवृत्ती वेगाने पसरत आहे. सरकार आता यावर कायदा करण्याचा विचार करत आहे, जेणेकरून या कामात सहभागी असलेल्या महिलांची सुरक्षितता आणि हक्क सुनिश्चित करता येतील.

## सिगारेट प्यायला बंदी, तर ॲश ट्रे का?

जागतिक स्तरावर विमानांच्या सुरक्षेसंदर्भात ठराविक नियम काटेकोरपणे पाळले जातात. हे नियम देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांना लागू असतात. असाच एक नियम म्हणजे, विमानात धूम्रपान करायचे नाही. विमानामध्ये धूम्रपान करण्यास बंदी असते.

विमानातील इंधन अत्यंत ज्वलनशील असते, तसेच विमान उड्डाणादरम्यान इतर प्रवाशांना सिगारेटचा त्रास होऊ शकतो. याबरोबरच अशा ज्वलनशील गोष्टींमुळे अपघाताची शक्यता असल्याने विमानामध्ये धूम्रपान करण्यास बंदी असते; मात्र असे असले, तरी विमानामध्ये सिगारेट विझवण्यासाठी वापरले जाणारे ॲश ट्रे मात्र दिसून येतात. आता कोणत्याही सामान्य व्यक्तीला असा प्रश्न पडू शकतो, की विमानात सिगारेट फुंकायला बंदी असते तर या ॲशट्रेचे इथे काय काय?

विमान हे फार गुंतागुंतीचे यंत्र आहे. त्यात शेकडो लोकांना एकाच वेळी घेऊन प्रवास करणाऱ्या विमानामधील छोटीशी चूक साऱ्यांचा जीव धोक्यात घालू शकते. त्यामुळे विमानप्रवासादरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेले अनेक नियम जागतिक स्तरावर तयार करण्यात आले असून त्याचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असते. याच नियमांद्वारे विमानात सिगारेट ओढण्यास परवानगी दिली जात नाही. असे असले, तरी प्लेनमध्ये ॲशट्रे असतात. अनेक नामांकित कंपन्यांच्या विमानांमधील शौचालयात ॲशट्रे आवर्जून दिसून येतात; मात्र त्याचबरोबर त्याच्याच बाजूला धूम्रपान करण्याची परवानगी नाही किंवा 'नो स्मोकिंग' चा बोर्डही दिसतो.

स्मोकिंग करायचे नाही, तर हा सिगारेट विझवण्याचा ॲशट्रे इथे का दिला आहे, एवढा वायफळ खर्च का केला जातो, यामागील लॉजिक काय आहे असे बरेच प्रश्न पडतात. धूम्रपानाला बंदी असली, तरी विमानांच्या टॉयलेटमध्ये ॲशट्रे बसवण्यामागे एक फारच खास कारण आहे. 'सोशल मीडिया'वर एका हवाई सुंदरीने प्रश्नाचे उत्तर दिले असून सध्या हे उत्तर चर्चेचा विषय ठरले आहे. हवाई सुंदरीने दिलेल्या माहितीनुसार, एखाद्या प्रवाशाने फ्लाइटमध्ये सिगारेट ओढण्याची चूक केली तर त्याला विमान जमिनीवर उतरल्यानंतर अटक केली जाते. धूम्रपान करण्यास बंदी असली, तरी विमानाच्या टॉयलेटमध्ये ॲशट्रे दिसून येतात. हे ॲशट्रे बसवण्यामागील कारण हे सुरक्षेचे आहे. सुरक्षिततेच्या उद्देशानेच विमानात धुम्रपान बंदी असतानाही ॲशट्रे बसवले जातात, असे तिने सांगितले.




काही प्रवासी बंदी असूनही विमानाच्या शौचालयात सिगारेट पेटवतात. त्यांना नंतर विमान लँड झाल्यावर अटक केली जाते; पण विमान उड्डाण करत असताना पेटलेली सिगारेट विझवण्यासाठी टॉयलेटमध्ये ॲशट्रे इन्स्टॉल केलेले असतात. एखादा प्रवासी विमानात धूम्रपान करताना पकडला गेल्यास त्याची सिगारेट कचऱ्याच्या डब्यात टाकली जात नाही. ही सिगारेट त्या ॲशट्रेमध्ये टाकली जाते. मागील काही काळात भारतामध्ये विमानात धूम्रपान करण्याच्या घटना घडल्या. कुवैतहून चेन्नईला येणाऱ्या 'एअर इंडिया'च्या विमानामध्ये धूम्रपान करणाऱ्या एका व्यक्तीला विमान चेन्नईमध्ये उतरताच अटक करण्यात आली. अशा प्रकारे विमानात धूम्रपान करण्याचा हा काही पहिलाच प्रकार नाही. या पूर्वी सुरत-कोलकाता विमानामध्ये बसल्यानंतर विमान टेक ऑफ करण्याच्या काही सेकंद आधी एका प्रवाशाने बिडी पेटवल्याने एकच गोंधळ उडालेला. या व्यक्तीला अटक करण्यात आली. अनेकदा अशा प्रकारे विमानामध्ये धूम्रपान करणाऱ्यांमुळे इतर प्रवासी अडचणीत येतात.



## या बेटांवर आहेत अनेक प्रतिबंध

जपानमध्ये ओकिनोशिमा नावाचं एक बेट आहे. महिलांना या बेटावर जाता येत नाही. तसंच पुरुषांनाही कडक नियमांचं पालन केल्यानंतरच या बेटावर सोडलं जातं. ओकिनोशिया बेटांना युनेस्कोतर्फे जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आलं आहे. हे बेट ७०० चौरस किलोमीटर परिसरात पसरलं आहे. हे बेट चौथ्या ते नवव्या शतकादरम्यान कोरियन बेटं आणि चीन यांच्यातल्या व्यापाराचं केंद्र असल्याचं म्हटलं जायचं. धार्मिक दृष्टिकोनातून या बेटाचं मोठं महत्त्व आहे. अनेक वर्षांपासून इथे धार्मिक प्रतिबंध घालण्यात आले आहेत. हे प्रतिबंध अजूनही टिकून आहेत. या प्रतिबंधांअंतर्गत महिलांना इथे प्रवेश दिला जात नाही. या बेटावर जाण्याआधी पुरुषांना निर्वस्त्र होऊन आंघोळ करावी लागते. वर्षभरात फक्त दोनशेच पुरुष या बेटावर जाऊ शकतात. या बेटावरून कोणीही काही घेऊन जाऊ शकत नाही. इथलं गवतही नेता येत नाही. इथल्या प्रवासाबद्दल कोणाला काहीच न सांगण्याचा सल्लाही दिला जातो. इथे मुनाकाता ताइशा ओकित्सु मंदिर आहे. हे समुद्राच्या देवीचं मंदिर आहे. याच कारणामुळे प्रवाशांवर अनेक प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

## श्रीमंती चोरी

श्रीमंती चोरी

आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेकजण चोरीच्या मार्गाला लागतात. गरिबी दूर करण्यासाठी हा मार्ग निवडला जातो. पण श्रीमंत माणसंच चोरीकडे वळली तर... लाखोंचा पगार घेणाऱ्या एका बँकेच्या अधिकाऱ्याने सँडविचची चोरी केली. लंडनमधल्या सीटी बँकेच्या मुख्य कार्यालयात अशी घटना घडली.

इथला एक बँकर बँकेच्या कँटिनमध्ये चोरी करताना पडकला गेला. तो सँडविच चोरत होता. विशेष म्हणजे हा साधासुधा कर्मचारी नव्हता. त्याचं वार्षिक उत्पन्न नऊ कोटी रुपये



म्हणजे एक दशलक्ष पाउंड इतकं होतं. महत्त्वाची बाब म्हणजे या बँकरचं नाव पारस शाह आहे. तो भारतीय वंशांचा बँक कर्मचारी होतं. पारस शाह यांच्यावर बऱ्याच जबाबदाऱ्या होत्या. त्यांना सँडविच चोरताना पहिल्यांदाच पकडण्यात आलं. त्यांनी याआधीही कँटिनमधून अन्न चोरल्याची शक्यता वर्तवण्यात आली. सँडविच चोरल्याच्या कारणामुळे त्यांना गलेलठ्ठ पगाराच्या या नोकरीवरून काढून टाकण्यात आलं.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करताना कर्तृत्ववान लोकसंचालित संस्थेच्या महिला सदस्या.

## नवरात्र उत्सवाच्या प्रारंभी 'कर्तृत्ववान' महिलांचे उपोषण

नगर – महिला आर्थिक विकास महामंडळाचे तत्कालीन जिल्हा समन्वय अधिकारी (सध्या ठाणे येथे कार्यरत) यांनी कर्तृत्ववान लोकसंचालित संस्थेच्या व्यवस्थापक महिलेसह संगनमत करून संस्थेत व बचत गटांमध्ये गैरव्यवहार व अफरातफर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याविरोधात कर्तुत्ववान लोकसंचालित संस्थेच्या महिला सदस्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. नवरात्र उत्सवाच्या प्रारंभीच महिलांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला असून, न्याय मिळवण्यासाठी आम्हाला दुर्गा रूप धारण करण्याची वेळ आणू नये, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. या आंदोलनात संस्थेच्या अध्यक्षा सिंधू वाणी, प्रतिभा गांधी, जयश्री झिने, निकिता कोरडे, संगीता महांडुळे, आरती रेगे, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा ॲड. स्वातीताई जाधव, राष्ट्रवादी जिल्हा महिला उपाध्यक्षा सुनिता वाल्हेकर, सोनाली वाघमारे आदींसह महिला सहभागी झाल्या होत्या.

महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी ११ जून २०१९ ते २३ मे २०२५ या कालावधीत अहिल्यानगर येथे कार्यरत होते. या काळात संस्थेच्या अध्यक्षा व कार्यकारिणी सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर निर्णय घेतले गेले. व्यवस्थापक महिलेला हाताशी धरून बचत गटातील योजनांमध्ये अनियमितता करून मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप महिलांनी केला आहे.

संस्थेच्या अध्यक्षपदावरून हटवण्याचा प्रयत्न, परस्पर सही बदलून आर्थिक व्यवहार, ठाण्याला बदली झाल्यानंतरही महिलांना त्रास, अशा आरोपांचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. महिलांनी सादर केलेल्या निवेदनात संस्थेचे ऑडिट हे धर्मदाय आयुक्तांच्या चौकशी अधिकाऱ्यामार्फत व्हावे, धर्मदाय आयुक्तांची आदेशाविना बँकेने सही बदल कसे केले, याची चौकशी व्हावी, महिला शेतकरी व उत्पादक शेतकरी यांच्याकडून सभासद फी म्हणून घेतलेले ११०० रुपये परत करावेत, कारण त्यातून कोणताही लाभ देण्यात आलेला नाही, स्मार्ट प्रकल्प व फूड प्रोसेसिंग युनिटच्या निधी खर्चाचा पारदर्शक अहवाल सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे. आरोपी अधिकारी व व्यवस्थापक महिलेवर कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. नवीन जिल्हा समन्वय अधिकारी कार्यालयामध्ये बचत गटातील महिलांना अपमानस्पद बोलणे, मानसिक छळ करुन दमदाटी करण्याचे काम करत असल्याचा आरोप देखील महिलांनी केला आहे. त्यांची तत्काळ बदली करुन महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयात जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून महिला अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## खा. निलेश लंकेंनी एनडीआरएफ टीम सोबत पुराच्या पाण्यात उतरत अडकलेल्या २५ ते ३० पूरग्रस्तांना काढले सुरक्षित बाहेर



पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी एनडीआरएफ टीमसोबत पुराच्या पाण्यात उतरलेले खा.निलेश लंके.

नगर – सीना नदीला मोठा पूर आल्याने या पुरात अडकलेल्या २५ ते ३० पूरग्रस्तांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी खा. निलेश लंके हे एनडीआरएफ टीम सोबत पुराच्या पाण्यात उतरले होते. त्यांनी व एनडीआरएफ टीमने सुमारे ३ ते ४ तासांच्या परिश्रमानंतर कर्जत तालुक्यातील मलठण गावात जिराफ वस्ती येथील या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवले.

सीना धरणाचा विसर्ग वाढल्यामुळे कर्जत तालुक्यातील निंबोडी, तरडगाव, मलठण तसेच जामखेड तालुक्यातील दिघी, फक्राबाद व चोंडी या गावांमध्ये पाणीपातळी वाढून मोठा पूर आला होता. कर्जत तालुक्यातील मलठण गावात जिराफ वस्ती म्हणून स्थित असणाऱ्या भागाचा सीना नदीच्या महापुरामुळे संपर्क २२ सप्टेंबर रोजी रात्रीपासून तुटला होता. जवळपास २५ ते ३० लोक त्या ठिकाणी अडकल्याची माहिती २३ सप्टेंबर रोजी दुपारी खा. लंके यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी सर्व नियोजित कार्यक्रम सोडून कर्जत गाठले. प्रशासनाने तेथे तात्काळ एनडीआरएफच्या टीमला पाचारण केले. खा. लंके हे स्वत: एनडीआरएफ टीम सोबत पुराच्या पाण्यात उतरले. जवळपास तीन ते चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर त्यांना त्या २५ ते ३० लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यश मिळाले.

पुराच्या पाण्यातून सुखरूप सुटका झालेल्या प्रत्येक चेहऱ्यावरची दिलासा देणारी स्मितरेषा, आईच्या कुशीत सुरक्षित पोहोचलेली लेकरं, वृद्धांच्या डोळ्यात दाटलेले आनंदाश्रू हे सर्व दृश्य मन हेलावून टाकणारे होते. या कार्यात सहभागी सर्व एनडीआरएफ जवान, अधिकारी व कार्यकर्ते यांना मनः पूर्वक सलाम! अशी प्रतिक्रिया खा. लंके यांनी या बचाव कार्यानंतर दिली.

## पुण्यातील गांधी ज्वेलर्सतर्फे २६ सप्टेंबरपासून अहिल्यानगरमध्ये 'दागिन्यांचे भव्य प्रदर्शन'

GANDHI
HOUSE OF JEWELS
(PABALWALA)

नगर – गेली दहा वर्षे आपल्या अद्वितीय डिझाईन्स आणि विश्वासाई सेवेने ग्राहकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे लक्ष्मी रोड, पुणे येथील गांधी ज्वेलर्स (पाबळवाला) पुन्हा एकदा अहिल्यानगरकरांसाठी दागिन्यांचे भव्य प्रदर्शन घेऊन येत आहेत. हे प्रदर्शन २६, २७ व २८ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील हॉटेल आयरिश प्रिमिअरच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे वेळापत्रक सकाळी १० ते रात्री १० असे असून, सर्व रसिक ग्राहकांसाठी ते खुले राहणार आहे.

या प्रदर्शनात डिझायनर ज्वेलरी आणि एक्सक्युझिव्ह कलेक्शन प्रथमच खासकरून अहिल्यानगरसाठी सादर करण्यात येत आहे. गांधी ज्वेलर्सकडून उपलब्ध होणारे सर्व दागिने हॉलमार्क व सर्टिफाईड असतात, यामुळे प्रत्येक ग्राहकाला दागिन्यांच्या शुद्धतेची आणि गुणवत्तेची हमी मिळते.


प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून शहरातील रिंकू फिरोदिया, मेघना मुनोत, मनीषा गुगळे, वैशाली चोपडा, अलका बलदवा, श्रद्धा बिहानी, दीपा गुरनानी आणि अनीता सेठिया तसेच विशेष अतिथी म्हणून समृद्धी कांकरिया कटारिया, जिज्ञासा मुनोत, नमिता फिरोदिया, वैशाली गांधी, अनीता विपुल सेठिया, आकांक्षा प्रतीक चोरडिया, शबनम धुप्पड, उज्वला लोढा व प्रेरणा अनिल कोठारी या उपस्थित राहणार आहे.

गांधी ज्वेलर्सकडून ब्रायडल, डायमंड, प्लॅटिनम तसेच पारंपरिक व आधुनिक दागिन्यांचा मनमोहक संगम पाहायला मिळणार आहे. विशेष आकर्षक ऑफर्स, विश्वासाई सेवा आणि अद्वितीय डिझाईन्स यामुळे हे प्रदर्शन अहिल्यानगरकरांसाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे. प्रदर्शनास भेट देवून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महात्मा गांधी रोड व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी शामराव देंडगावकर, कार्याध्यक्ष सतीश मुथा, उपाध्यक्ष नंदलाल डोंडेजा तर सचिवपदी किरण व्होरा

### सहसचिव ॲड.विशाख वैद्य, खजिनदार कमलेश आहुजा; असोएिशनची २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठी नूतन कार्यकारिणी जाहीर





नगर – महात्मा गांधी रोड व्यापारी असोसिएशनची २१ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेत सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठी कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे. त्यात अध्यक्ष म्हणून शामराव देडगावकर, कार्याध्यक्ष सतीश मुथा, उपाध्यक्ष नंदलाल डोडेजा, सचिव किरण व्होरा, सहसचिव ॲड.विशाख वैद्य, तर खजिनदार म्हणून कमलेश आहुजा यांची निवड करण्यात आली. त्यात संचालक मंडळाची निवड करण्यात आली असून, यात रुपेश नहाटा, निलेश नेवासकर, संभव काठेड, महेश लुणिया, राहुल मुथा, दिपक तलरेजा, भागचंद रायसिंगानी, पवन किथानी, आनंद मुथा, पेमराज पोखरणा, कुणाल नारंग, उत्तम गुगळे यांचा समावेश आहे.

व्यावसायिकांना येणाऱ्या अडचणी तसेच दसरा, दिवाळी सणानिमित्त योग्य ते नियोजन करण्यात आले. ग्राहकांसाठी विशेष लकी ड्रॉ स्पर्धेचे आयोजन करण्याबातचा निर्णयही या सभेत घेण्यात आला. यावेळी असोसिएशनचे सभासद उपस्थित होते. मालाच्या गुणवत्तेच्या बाबतीत दुकानदारांनी कधीही तडजोड केलेली नाही. ग्राहकांसाठी आयोजित केलेल्या लकी ड्रॉ योजनेचा अधिकाधिक ग्राहकांनी फायदा करून घ्यावा, असे आवाहन महात्मा गांधी रोड व्यापारी असोसिएशनचे सचिव किरण व्होरा यांनी केले आहे.



पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपूरा येथील राधा–कृष्ण मंदिरात नवरात्र उत्सवानिमित्त माता की चौकीचा कार्यक्रम उत्साहात व भक्तीमय वातावरणात पार पडला.

## शहरातील राधा–कृष्ण मंदिरात रंगली माता की चौंकी

### भक्तीगीतांवर भाविकांनी धरला ठेका, महिलांचा रंगला रास गरबा नृत्य

नगर – पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपूरा येथील राधा–कृष्ण मंदिरात नवरात्र उत्सवानिमित्त माता की चौकीचा कार्यक्रम उत्साहात व भक्तीमय वातावरणात पार पडला. बबलू दुग्गल जागरण मंडळाच्या कलाकारांनी देवीचे भक्तीगीत सादर केले.

याप्रसंगी शीख, पंजाबी समाज बांधवांसह महिला उपस्थित होत्या. रात्री रंगलेल्या माता की चौकी कार्यक्रमात विविध भक्ती गीतांमध्ये भाविक रममाण झाले होते. देवीच्या एकाहून एक सरस भक्तीगीतांनी वातावरण प्रसन्न बनले होते. चलो बुलावा आया है!..., भक्त चलो, दरबार चलो...., दुखीयो के कष्ट निवारी, आज हे जगराता..., मेरी माँ, मेरी माँ.... आदी गीतांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. तर देवीच्या जागरण–गोंधळाच्या गिताने कार्यक्रमात रंगता आनली. वाद्यांसह भक्तीगीतांवर बहरलेल्या कार्यक्रमाचा भाविकांनी मनमुराद आनंद लुटला.

शेवटच्या टप्प्यात महिलांनी रास गरबा नृत्य केले. तर भाविकांनी भक्तीगीतांवर ठेका धरला होता. भक्तीमय वातावरणात रंगलेल्या कार्यक्रमाचा उत्साह शिगेला पोहचला होता. हात उंचावून भाविकांनी देवी मातेचा जयजयकार केला. देवीच्या रुपात प्रकट झालेल्या दानी बबलू राजपूत या चिमुकलीने सर्वांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाचे योगेश धुप्पड व धुप्पड परिवाराच्या वतीने देवीची आरती करण्यात आली. ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता व सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. भंडाऱ्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९:३० वाजता महिला भजन मंडळीच्या उपस्थितीमध्ये पूर्णाहुति यज्ञाने उत्सवाची सांगता होणार आहे. तर १ ऑक्टोबरला समाजबांधवांच्या उपस्थितीमध्ये दसरा सण साजरा केला जाणार आहे.

## दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप बँकेची २५ सप्टेंबरला वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को. ऑप बँकेची सन २०२४–२०२५ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा २५ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता अहिल्यानगर येथील स्टेशनरोड वरील बँकेच्या यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात होणार असून या सभेकरिता विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील हे उपस्थित राहणार असलेची माहिती बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

जिल्हा बँकेने डिजीटल बँकींगमध्ये आघाडी घेतली असून बँक २८७ शाखासह ११ विस्तार कक्षाचे कोअर बँकींग पद्धतीने संगणकीकरण केले असून बँक ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील बँकींग सेवा जलद व तत्पर देत आहे. आधुनिक डिजीटल बँकींग युगाकडे जात असतांना बँकेने एनी ब्रँच बँकिंग, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस, आधारवेस पेमेंट, डीबीटी, एटीएम, पॉज आणि ई–कॉमर्स सह एसएमएस अलर्ट सेवा, मोबाईल बँकींग, फोन पे, गुगल पे, पेटीएम, भिम ॲप इ. युपीआय सेवाही ग्राहकांना उपलब्ध करुन दिली असून रुपे डेबिटकार्ड सह शेतक–यांना रुपे किसान क्रेडिट कार्ड ही उपलब्ध करुन दिलेले आहे. याचाच एक भाग म्हणून वार्षिक सर्वसाधारण सभेचे औचित्य साधून ना. राधाकृष्ण विखेपाटील यांचे हस्ते व प्रा.राम शिंदे यांच्या उपस्थितीत बँकेच्या क्युआर कोड सुविधेचा शुभारंभ होणार असलेची माहिती आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

यांप्रसंगी जिल्हयातील आजी माजी खासदार, आमदार उपस्थित राहणार असून जिल्हयातील बँकेचे सभासद, सभासद संस्थांचे प्रतिनिधी व शेतक–यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी केले.



अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कांदा पिकांचे मोठे नुकसान झाल्याने पंचनामे करून तात्काळ मदत द्या, या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तहसिलदारांना देण्यात आले.

## अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कांदा पिकांचे मोठे नुकसान, पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी

नगर – मागील काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे अहिल्यानगर तालुक्यातील शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतीतील पोयटा माती वाहून गेल्याने बळीराजाला प्रचंड फटका बसला असून तात्काळ मदत देऊन पिकाची नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी तहसीलदार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे, शरद पवार, भारत बोडखे, चंद्रकांत पवार, गणेश तोडमल, पापामिया पटेल, अशोक बनसोडे आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सोयाबीन पिके पूर्णपणे जमिनीत कुजून गेल्यामुळे उत्पादन घेण्याची शक्यता संपुष्टात आली आहे. कांदा पिकावर सततच्या पावसाचा परिणाम होऊन गळ, रोगराई व कुज येत असून शेतकऱ्यांना लाखोंचा तोटा सहन करावा लागत आहे. यामुळे आधीच कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर झाली आहे त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करावेत. पंचनाम्यानुसार शासकीय नियमाप्रमाणे योग्य मोबदला व आर्थिक मदत द्यावी. तात्पुरत्या स्वरूपात इतर शासकीय योजना उपलब्ध करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

शेतकरी वर्ग शासनाकडे मोठ्या अपेक्षेने पाहत असून, या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी पक्षाच्या वतीने तहसीलदार यांच्याकडे करण्यात आले आहे.

## नवरात्रोत्सवात ठिकठिकाणी होतोयं मातृशक्तीचा जागर; 'आदर्श परिवार' घडवण्यासाठी 'विचार भारतीचा' उपक्रम

नगर – आदिशक्ती देवीचे नवरात्र सध्या सर्वत्र भक्तिभावाने साजरे होत आहे. या नवरात्र उत्सवात मराठमोळ्या लोककलेच्या माध्यमातून मातृशक्तीचा जागर अहिल्यानगर शहरात विचार भारतीच्या वतीने करण्यात येत आहे. 'मातृशक्तीचा जागर करू या ! आदर्श परिवार घडवू या !' या समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन शहरात ठिकठिकाणी करण्यात येत आहे. लोककलावंत अभियंता सोमनाथ तरटे हे साथीदारांसह शहरातील विविध नवरात्रीच्या मंडळांमध्ये रोज सायंकाळी गोंधळाच्या माध्यमातून कर्तृत्ववान मातृशक्तीचा जागर करून भाविकांमध्ये वैचारिक जनजागृती करत आहेत.

या उपक्रमाचा शुभारंभ पाईपलाईन रोड वरील तुळजाभवानी देवी मंदिरात करण्यात आला. या कार्यक्रमातून आदिशक्ती देवीच्या जागर होण्याबरोबरच राजमाता जिजाबाई, पुण्यश्लोक अहिल्याबाई, रणरागिणी राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, संत कान्होपात्रा, गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर, सुवर्णकन्या पी.टी. उषा, अंतराळवीर कल्पना चावला व सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कर्तृत्ववान स्त्रियांच्या कर्तृत्वाचा जागर करणारे फ्लेक्सचे प्रदर्शन कार्यक्रम स्थळी लावण्यात आले होते. तसेच मी शिवबा घडवणार, मी जिजाऊ होणार ! हा सेल्फी पॉईंटही येथे लावण्यात आला होता. या सेल्फी पॉईंटचे उद्घाटन मंदिराच्या महिला सदस्यांच्या व महिला भाविकांच्या उपस्थित झाले. हे प्रदेशन पाहण्यासाठी व सेल्फी पॉईंटवर सेल्फी घेण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती.

### 'मी शिवबा घडवणार, मी जिजाऊ होणार !' सेल्फी पॉईंटचे उद्घाटन



नवरात्र उत्सवा निमित्त अहिल्यानगर शहरात विचार भारती आयोजित 'मातृशक्तीचा जागर करू या ! आदर्श परिवार घडवू या !' या समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात 'मी शिवबा घडवणार, मी जिजाऊ होणार !' या सेल्फी पॉईंटचे उद्घाटन पाईपलाईन रोड वरील तुळजाभवानी मंदिरात महिला भाविकांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अभियंता सोमनाथ तरटे यांनी गोंधळ लोककलेतून कतृत्त्ववान स्त्रियांच्या महिमा सांगून महिलांमध्ये प्रबोधन केले, तसेच बाल शाहीर गणेश जाधव याने आपल्या पहाडी आवाजात शिवाजी महाराजांचा जयजयकारात अफजल खानाचा वधाचा पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी विचार भारतीचे उपाध्यक्ष अशोकराव गायकवाड, उपक्रमाचे प्रमुख पुष्कर कुलकर्णी, अशोक कानडे, अमित खामकर, ओमप्रकाश तिवारी, स्मिता शितोळे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे आदींसह भाविक उपस्थित होते.

विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, सचिव सुधीर लांडगे, सहसचिव महेंद्र जाखेटे व उपक्रमाचे संयोजक पुष्कर कुलकर्णी आदींनी या उपक्रमाचे नियोजन केले.


**जावक क्रमांक/३२४६/२०२५, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, २ रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, आकाशवाणीसमोर, सावेडी, अहिल्यानगर, दि.२३/०९/२०२५**

### चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: AHM/3002/18/25, फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः--------------

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक शिवशंभो ट्रस्ट ठोंबरे मळा नगर–पुणे रोड, शाहुनगर,केडगाव बायपास केडगाव अहिल्यानगर बाबत.. **न्यासाचा पत्ता :**– द्वारा सौ. कमल शंकर ठोंबरे, गट नं. ४७८/१, नगर–पुणे रोड, केडगाव बायपास, ठोंबरे मळा, शाहुनगर, केडगाव अहमदनगर, **अर्जदार – शंकर हरिभाऊ ठोंबरे.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत. (१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खात्री निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | कॅश | ५१०००.०० |

(अ) जंगम मिळकत:– रोख रु. ५१०००/– मात्र (अक्षरी रुपये एक्कावन्न हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मूल्य : |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |

(ब) स्थावर मिळकत:– रोख रु. ०/– मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यनिशी आज दिनांक १९–०९–२०२५ रोजी दिली.

प्रतः
१. उपरोल्लेखीत मालमत्तेवर डकविणेसाठी. २. न्यासाचे कार्यालयावर डकविणेसाठी
३. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी. ४. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविणेसाठी.
५. (इतर असल्यास उल्लेख करावा..)
(टिपः आवश्यक बरोबरची तेथे खुण करावी)

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

